2017

December 2017

December 31

असे लोकच फक्त घ्यावेत टीव्हीवरच्या चर्चांमध्ये --

Champra Deshpande commented on Mangesh Narayanrao Kale's post.

कलेचा प्रत्यय, प्रयोजन नि दायित्व...

esakal.com

उत्तम झाली लेख मालिका ! याचे पुस्तक व्हावे !

आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे --

छोटी दुरुस्ती -- ' जन्मभरी तो जळतचि होता ' असे हवे.

परात्मतेचे टोक !

नेटवर शॅलोम फ्रीडमन नामक एक उत्तर-आधुनिक कवी आहे -- त्याच्या नुसत्या नेटवरच्या फ्री -- मोफत कविता ४००० आहेत !

बरे, इकडची कळण्याची धावपळ उरकावी तेवढ्यात एकजण येऊन म्हणतो की ओबामा अजून आपल्याला कळलेलेच नाहीत !

इकडची धावपळ उरकेपर्यंत कुणी म्हणणार की आपल्याला ओबामा अजून कळलेच नाहीयत !

-- हेच आपल्याला कळलेले नाहीय !

बरे, असे शिकत, प्रगती करत मी ६३ व्या वर्षापर्यंत पोचलो समजा तर त्या वेळी कुणितरी येऊन म्हणणार की आपल्याला सतीश तांबे अजून कळलेलेच नाहीत किंवा चंप्र अजून कळलेलेच नाहीत ! म्हणजे बोंबला ! पुन्हा सुरुवात !

आपल्याला बुद्ध अजून कळलेलाच नाही ( म्हणजे, मला कळलाय ! ), आपल्याला आंबेडकर अजून कळलेलेच नाहीत ( म्हणजे, मला कळलेयत ! ) -- असे ऐकत गेल्यावर, असे एकेक समजून घ्या, मग माणुसकीयुक्त व्हा, मग सहिष्णू व्हा -- असे करत ६०-७० वर्षे संपून जातील -- आणि तरीही ' समजण्याची ' खात्री नाहीच ! -- करावे काय ? -- असा प्रश्न कुणालाही पडणे साहजिक आहे !

रोज उठून कुणितरी काही ना काही असेच बोलतोय -- तो ' आपण ' म्हणतो तेव्हा, तो सोडून, असे असते ते ! त्याला कळलेय, इतरांना नाही, असे !

चित्रपट, संगीत, नाटक, नृत्य, कथा, कादंबरी, चित्रकला, वगैरे सगळे आभासी ? फारच आध्यात्मिक बुवा तुम्ही ! ही तर मायावादाची भूमिका झाली ! आता, प्रेम, राग, लोभ, द्वेष -- हेही आभासी म्हणा आणि मुक्तच व्हा !

बॅले नृत्य !

साधा -- खुल्या दिलाचा -- सहज -- सैल -- no rigidity --

कलेतून जगण्याचे पूर्ण भान येणे -- हे घडले तर तिथे समजून देणारी अधिकारवाणी राहणार नाही --

जीवनवादी आणि कलावादी हे द्वंद्व -- अजून तेच चालू ? कला माध्यमातून जगणे समजून घेण्याची प्रक्रिया -- असे मी पाहतो --

ही खाता येणारी भूमिका ! बाकी भूमिका इतरांना पाणी पाजण्यासाठी असतात !

नाटक -- प्रायोगिक नाटकांसाठी छोटी मोफत थियेटर्स.

'खुळ्या मनाला काय जाहले काही मुळी उमगेना, कुठली फुंकर हवी त्यावरी काही काही कळेना...'
गालिब ना ? ग्रेट भारतरत्नच म्हणायचा हा !

म्हणजे एकाहून जास्त अकला असणारा, नकलाकार आणि कलाकार नसलेला !

दोघेही एकमेकांना म्हणतात -- साहित्यात, कलेत जे डायरेक्ट, रोज चाललेय त्यावर बोलतोय इथे -- आणि तुम्हीच म्हटल्याप्रमाणे शासन वा समाजगट दहशत तयार करतातच !

उलट उजव्यांनी त्यांना दहशत तयार केलीय अशी त्यांची हाकाटी असते !

मी कधी कधी जुनी गाणी ऐकतो -- तेव्हा ही गंमत लक्षात आली -- एक मजा म्हणून फ्रेंडसबरोबर शेयर केली, इतकेच !

मराठीत डाव्या विचारसरणीच्या लोकांनी फार दहशत निर्माण केलेली आहे -- राजकीय सत्तेपासून ते शतयोजने दूर असले तरीही --

त्यांना एकाच प्रकारची सैनिकी कला हवी आहे. कलेतले अनुभवद्रव्य काय आहे यावर तिचे मूल्य अवलंबून नसते, ही अगदी प्राथमिक बाबही यांना समजत नाही. किंबहुना, या लोकांना एकूण कलेतलेच काही समजत नाही. हे फक्त राजकीय कार्यकर्ते असतात ! तरीही, या महाराष्ट्रात हे सांस्कृतिक सत्ता बळकावून बसलेले आहेत. यांना विरोध करणे वा प्रश्न विचारणे म्हणजे जणू काही माणुसकीविरुद्ध आणि पीडितांविरुद्ध असणे, असे तद्दन खोटारडे चित्र यांनी उभे केलेले आहे ! हे लोक कलेचे क्षेत्र बरबाद करत चाललेले आहेत. प्रचंड दहशत आणि दबाव तयार करण्यात ते सध्या तरी यशस्वी झालेले दिसताहेत !

स्पेस ( अवकाश ) जरा खुली करून घेणे चाललेय -- अतिरेकी विचारांचे कुणीही अमान्यच !

किरकोळ खाजगी जगणे आणि सामाजिक अत्युच्च जगणे हे खोटे भेद या भूमिकावाल्यांनीच पाडलेले आहेत. यांना वाटते की धारावीच्या झोपडपट्टीत जगणाराच फक्त चांगली कला निर्माण करू शकतो ! ते खोटे आहे. कलेतला अनुभवरूपी कच्चा माल कोणता आहे यावर तिचे मूल्य अवलंबून नसते !

या विषयावर बोलले तर हमखास उघडे पडायला होणार, त्यामुळे, इतरांना भित्रे म्हणणारे शूर भूमिकावाले इथे लपवाछपवीच करणार, याची कल्पना होतीच ! ते जर इतर प्रामाणिक साहित्यिकांना भित्रे, बेजबाबदार, असंवेदनशील, आत्ममग्न, भरल्या पोटी करमणूक करणारे -- असे काहीही म्हणू शकतात तर त्यांनीही स्वतःचे खरे स्वरूप उघडे पाडणारे

शब्द ऐकायची तयारी ठेवायला हवी. यांच्या विचारसरणीविरुद्ध बोलणे वा तीबाबत प्रश्न विचारणे म्हणजे जणू काही माणुसकीविरुद्ध वा पीडितांविरुद्ध असणे, असे एक खोटारडे चित्र यांनी निर्माण केलेले आहे. साहित्यातून आणि कलेतून मानवी जगणेच वर्ज्य करू इच्छिणारे असे यांचे भयानक विचार आहेत ! तालिबान वा खाप पंचायतवाले आणि हे लोक सारखेच आहेत ! यांच्या हातात राजकीय सत्ता नाहीय वा येण्याची शक्यताही नाहीय, पण, सांस्कृतिक क्षेत्रात यांनी सत्ता काबीज करून त्या क्षेत्राची वाट लावलेली आहे ! या लोकांना एकाच प्रकारची सैनिकी कला हवी आहे ! यांना राजकीय सत्ता मिळाली तर हे काय करतील ते स्पष्ट आहे ! हे सतत चालवून घेणे अशक्य झाल्याने यावर स्पष्ट बोलायचे ठरवले. कला म्हणजे बक्षिसे वा सन्मान फक्त नव्हे, कलेचे माणसाच्या जगण्यात मूल्यात्मक स्थान असते. ती मूल्यात्मकताच हे नष्ट करत आहेत. मला लेखक म्हणून कुणी लिहायचे थांबवतेय का, एवढाच प्रश्न नाही. सांस्कृतिक वातावरण खुले नसेल तर सर्वच प्रकारच्या कलांची स्पेसच ( अवकाश ) नष्ट होण्याचा धोका आहे. तो टाळण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला पाहिजे, असे वाटले ! असो.

तुम्ही ' वेटिंग फॉर गोदो ' हे नाटक मानणारे आहात -- तुमच्याकडून तरी या भूमिकावाल्यांना बळ मिळू नये, असे वाटले ! यांच्या विचारसरणीविरुद्ध बोलणे वा यांना प्रश्न विचारणे म्हणजे जणू काही माणुसकीविरुद्ध वा पीडितांविरुद्ध बोलणे, अशी दहशत यांनी गेली अनेक वर्षे इथे निर्माण करून ठेवलेली आहे ! तिला विरोध करायची, त्यांचे खरे स्वरूप उघडे पाडायची इच्छा कुणालातरी कधीतरी होणारच ! या लोकांना जशी दुसऱ्यांची दहशत चालत नाही तशीच इतर कुणाला यांचीही नाही चालणार ! स्वातंत्र्य आणि विवेक या शब्दांचा सतत वापर करणारे हे एक नंबरचे ढोंगी आणि तालिबानी वा खाप प्रवृत्तीचे, भयानक विचारांचे लोक आहेत !

त्या दहशतीला विरोध करणेही घडणारच -- मराठीत या भूमिकावाल्यांची प्रचंड दहशत आहे -- आणि हे लोक, स्वातंत्र्य आणि विवेक यांवर लोकांचे प्रबोधन करणार !

इतके सारखे लेखकांचे प्रबोधन करणारे लोक यावर काय बोलतात, याची खरेच उत्सुकता आहे ! साहित्यातून आणि कलेतून एकूण मानवी जगणेच हद्दपार करायचा यांचा प्रयत्न आहे, असा माझा पक्का समज झालाय -- तो बरोबर आहे का, हे मी नम्रपणे तपासून घेतोय --

नाउमेद होण्याचा प्रश्नच नाही -- फार चर्चेत असलेल्या विषयात क्लॅरिटी आणायचा प्रयत्न करण्यानेही कुणी टची होऊ नये -- आणि हे अभिव्यक्तिस्वातंत्र्याशी संबंधित आहे -- एकमेकांचे काय आहे नेमके म्हणणे, हे विचारू नये ? काही वेगळी अभिरुची जिवंत ठेवणे आणि फैलावणे -- यासाठी मला हे वैध वाटते !

सगळ्यांना म्हणजे ही भूमिकेची मग्रुरी ज्यांना झुगारून द्यायचीय, त्यांना --

अहो, मला कुणी नाही घाबरत -- मला साहित्यातून हाकलून देऊ नका, एवढेच तर मी विनवतोय --

अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि विवेक -- असे शब्द उठताबसता वापरणारे लोक असे उद्दाम हुकूमशाहीने बोलतात, हे खेदजनक आहे !

साहित्य हे फक्त राजकीय परिवर्तनाचे वा कृतीचे हत्यार वा साधन आहे -- असे कुणी उजवा म्हणाल्याचे मला माहीत नाही -- ते सगळे कालिदास, टागोर अशा अनेक मोठ्या लेखकांना स्वीकारतानाच दिसतात ! बीजेपीवाले वा काँग्रेसवाले मराठी साहित्यात फारशी अरेरावी करताना दिसत नाहीत ! याउलट डावे लोक, सगळे मानवी जगणेच साहित्यातून वर्ज्य करायच्या प्रयत्नात दिसतात -- त्यामुळे आधी तेच पाहायला हवे --

ते केलेय क्लियर वर -- नंतर जरा एडिट केलेय -- पुन्हा पाहा, प्लीज -- डाव्यांनी सारखाच धोशा लावलाय हे एक आणि तुम्ही म्हटल्याप्रमाणे ' त्यांची चलती ' असण्याचा गैरफायदा घेतला जातोय -- म्हणून त्यांच्यावर भर --

आधी भूमिका घेऊन मग जगण्याकडे पाहायचे -- असे न करणारे खूप मौल्यवान कलावंत, साहित्यिक आहेत -- डाव्याउजव्याचा नाही प्रश्न -- समाजवादी आणि व्यक्तिवादी असा विरोधही मला खोटा वाटतो -- पिरांदेल्लोचे ' सिक्स कॅरॅक्टर्स -- ' याला आपण व्यक्तिवादी म्हणू शकतो ? तुमचीच ' ना मा निराळे ' ही कथा व्यक्तिवादी आहे की समाजवादी ?

कोणतीच दहशत नको -- भूमिकावाले इतर सगळ्यांना हाकलून देऊ इच्छितात, हे स्पष्ट दिसतेय -- ते म्हणताहेत त्याव्यतिरिक्तचे ते साहित्यच नव्हे, असे तेच म्हणताहेत -- म्हणून ते -- हळू हळू नाही -- मी सातत्याने तेच मांडतोय -- मी उल्लेख केलेले साहित्यातले अनेक प्रकार उजव्यांनाही चालणारे नाहीयत -- ती कलाच नव्हे, असे कुणी उजवे म्हणत असतील तर तेही चूकच ! त्यामुळे, डावे-उजवे हा मुद्दा नाहीय --

डावी राजकीय भूमिका व्यक्त करणे हेच फक्त साहित्य-कलेचे वा इतर कोणत्याही कलेचे काम असते, असे समजणारे लोक हे फक्त राजकीय कार्यकर्ते असतात -- त्यांना कलेतले काही समजत नाही !

त्यांना ते कळलेही असते कारण ते हट्टाग्रही वा दुराग्रही नसतात !

आणखी अनेक प्रकारचे साहित्य असते जे वाचकांत परिपक्वतेचे, संवेदनशीलतेचे भान आणू शकते -- पण या भूमिकावाल्यांना ते कळतच नसल्याने ते, ते सगळे त्याज्य ठरवतात !

त्यांच्या भूमिकेतूनच सर्वांनी लिहायला हवे -- तसे जे करणार नाहीत -- ज्यांचे आकलन त्यांच्याहून वेगळे असेल ते सगळे बेजबाबदार, पळपुटे -- असे म्हणताहेत ते ! ते डॉ. गणेश देवी तर म्हणतात की ' तशी ' भूमिका नसलेले ते साहित्यच नव्हे ! ही तर तालिबानी विचारधारा झाली !

सगळे तथाकथित विद्वान, सर्वच लेखकांनी भूमिका घ्यायला पाहिजे असा घोशा लावत आहेत -- त्यावरून चाललेय -- सध्याच्या नियोजित अध्यक्षांबद्दल तर माझी भविष्यवाणीच आहे की हे फक्त -- मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, सीमावाद आणि लेखकांना परिस्थिती समजावून सांगून त्यांनी काय केले पाहिजे, हे सांगणे -- एवढेच बोलू शकतील ! साहित्यावर हे शून्य बोलतील !

घेऊ द्या ना -- पण, सगळ्या लेखकांनी तेच करायला हवे, ही हुकूमशाही नको -- आणि भूमिका म्हणजे साहित्य-कलेच्या क्षेत्रातून मानवी जगणेच हद्दपार करणे असेल तर हे बुद्धमूर्ती फोडणाऱ्या क्रूर आणि निर्बुद्ध तालिबान्यांहून भयानक आहे !

म्हणूनच तर मला झेपेल तेवढ्या शूरपणे मी त्यावर बोलतोय ! आपणच तेवढे जबाबदार आणि बाकीचे पळपुटे हा यांचा उद्दामपणा आणि असहिष्णुता किती चालवून घ्यायची ?

विषयही सगळीकडे हेच चालू असल्याचे दिसते ! माझे या बाबतीतले आकलन मी इथे अनेकदा सविस्तर मांडलेले आहे.

होय -- तुम्ही समाजवादी किंवा कम्युनिस्ट किंवा तत्सम काही असलेच पाहिजे, आणि तुमच्या लेखनातही तीच भूमिका व्यक्त व्हायला हवी, असेच खरे तर त्यांना म्हणायचे असते, पण, तसे म्हणायला ते लाजतात !

अति-वास्तववाद, अस्तित्ववाद, उत्तर-आधुनिकता, ऍब्सर्ड या सर्वच विभागांतले लेखन -- हे सगळे भूमिकावाल्यांच्या मते बेजबाबदारपणाचे आणि पळपुटे असेल तर त्यांनी शूरपणे तसे म्हणायला हवे ! त्यात लपवाछपवीचा पळपुटेपणा करू नये ! भूमिका म्हणजे त्यांना काय हवेय, हे लोकांना निःसंदिग्धपणे कळले पाहिजे ! आडून आडून बोलण्यात कसले आलेय शौर्य ?

आपल्याला साहित्य-कलेतले जे जे कळत नाही त्या सर्व गोष्टींची टवाळी वा हेटाळणी करायची -- ही पद्धतच पाडलीय मराठीत -- विनोदी लेखक, नेमाडे आणि भूमिकावाले यांनी !

सगळेच चांगले लेखक त्यांना तातडीचे आणि महत्त्वाचे वाटते तेच लिहितात -- अमुकच भूमिका नाही म्हणून कुणाला हेटाळू नका -- बेजबाबदार, पळपुटे म्हणू नका -- सहिष्णुता हवीच -- निराशावादी असणे, गोंधळलेले असणे, सगळेच निरर्थक-- मूल्यहीन वाटणे -- अशाही काही लेखकांच्या खऱ्या भूमिका असतात -- ते सगळे बेजबाबदार आणि पळपुटे ?

आणि लेखक स्वतःच्या चिंतनातून -- आकलनातून लिहितील ना -- या मूर्खांनी सर्वच लेखकांना शिकवायची काय गरज आहे ? साहित्य म्हणजे काही एकच भूमिका घेणाऱ्यांचे गणवेषधारी सैन्य नव्हे !

भूमिकाही हजार असतात हो -- यांना एकच भूमिका -- ते म्हणतील तीच -- असे म्हणायचे असते -- हे म्हणतील ती भूमिका न घेणारे ते सगळेच बेजबाबदार ! आणि, आपण कोणतीच परिवर्तनाची भूमिका न घेता लिहितो, असे अनेक नोबेलविजेतेही म्हणतात -- ते सगळे पळपुटे ? मग, हे कोण मोठे शूर लागून गेलेत ? तेच तेच रटत राहणे -- हे शौर्य ?

हिंदुत्ववादी असणे, हीही एक भूमिकाच असते, पण, तिला हे भूमिका म्हणून मान नाही देत ! त्यामुळे, हीही भूमिका -- तीही भूमिका -- अशा आत्मसमाधानाचा काही उपयोग नाही !

बाकीचे ठीक -- पण, वैचारिक प्रगल्भ -- हेच वदतो व्याघात आहे -- contradiction in terms !

तटस्थपणे लिहून बघा -- सगळे गोंधळून शहाणे होतील !

हे फक्त साहित्यावर बोलणे शक्यच नाही -- साहित्य वगळून बाकी सगळ्यावर बोलतील -- भूमिकावाल्यांचा हा नेहमीचाच प्रॉब्लेम असतो --

यांना साहित्यातले काही कळत नाही -- ते सारखी राजकीय बौद्धिके घेऊन लेखकांना शाळेतली मुले समजताहेत, हे वाईट आहे, असे माझे मत मी माझ्या स्वातंत्र्यात व्यक्त केलेय !

हे घ्या -- हे सज्जन रोज लेखकांच्या शेपट्या पिरगाळतच राहणार आहेत --

बुद्धमूर्ती फोडणारे तालिबानी आणि सांस्कृतिक क्षेत्रातून मानवी जगणेच हद्दपार करणारे हे भूमिकावाले -- दोघेही सारखेच !

आपला संवाद जिथपर्यंत येणे शक्य होते तिथपर्यंत येऊन पोचला आहे ! अनेक भूमिका, अनेक मूल्ये हे एका विनाशकारक परिस्थितीत जाऊन पोचते, हेच मी म्हणत होतो -- तेच तुम्हीही म्हणताय. भूमिका फेल जाते या बिंदूपासून मी पुन्हा भूमिकेचा शोध नाही घेणार -- वेगळे काय शक्य आहे, असा प्रश्न विचारणार -- याच्या शोधाला द्यायच्या तर द्या शुभेच्छा !

हे मान्य ! तुम्ही इथेच थांबता -- हा पुढील शोधाचा आरंभबिंदू ठरावा, असे मला वाटते -- एवढाच फरक आहे !

आता जे सगळीकडे चालू आहे ते हजारो मूल्यांचे रणकंदन आहे -- यात हितकारक काय आहे ?

मतभेद असले, आकलन वेगळे असले म्हणून शत्रू थोडेच होणार ? लोकशाही, सहिष्णुता तर लागणारच !

प्रतिक्रियेसाठी लेख -- म्हणजे साहित्य हे प्रतिक्रियेचे नसते, असे म्हणताय का ? मग, साहित्यातली भूमिका म्हणजे काय ?

इथे कुणी मित्र-शत्रू नाहीत -- आपण सगळे मित्रच आहोत !

हे मानवी जगण्यातले प्रश्न आहेत आणि हे समजायला खूप विद्वत्तेची गरज नाही, ती विद्वत्तेची मक्तेदारी तर मुळीच नाही, असे मी मानतो. धर्मविषयक चर्चेत एके काळी असे विद्वत्तेचे अनावश्यक महत्त्व माजलेले होते, ते नंतर राहिले नाही. भूमिकांची अनेकता असल्यावर मूल्यात्मकतेबद्दल बोलता येत नाही, असे मी म्हटले आहे -- त्यावर तुम्ही बोलावे, अशी अपेक्षा आहे.

तुम्ही दूषणे देऊन चर्चा संपवत आहात. त्यापेक्षा तुम्ही थोडक्यात ' योग्य भूमिका ' म्हणजे काय, हे सांगू शकलात तर बरे होईल. तुमचे एकरेषीय विश्लेषण, कितीही संदर्भ घेतलेत तरीही ' सत्य ' असू शकणार नाही -- माझ्या बोलण्यातल्या त्रुटी ठीक -- पण, या विषयावर तुमचे आकलन मांडा ना -- माझ्याशी चर्चा असे त्याचे स्वरूप न ठेवता -- तुम्ही मला ग्रेट म्हणालात पण, मी तसा उपरोध वापरू इच्छित नाही --

' प्रतिक्रिया नसणे ' म्हणजे भूमिका नसणे -- हे लक्षात घेतलेय का तुम्ही ? अन्यथा, बिनप्रतिक्रियेची भूमिका म्हणजे काय, ते तरी सांगा. किंवा, तुमच्या शब्दांत ' बिनप्रतिक्रियेचे सांगणे ' म्हणजे काय ?

प्रत्येकजण भूमिका घेतच असतो, असे म्हणणे असेल तर त्यातली शौर्याची कोणती हे कुणी ठरवायचे ? समजा क्ष ला वाटते की त्याचीच भूमिका शौर्याची आणि श्रेष्ठ तर बाकीच्यांनी काय करायचे ?

प्रत्येक पवित्रा हा एक भूमिकाच असतो -- हे लिहिलेय वर -- कृपया सगळे वाचा -- जगणे पवित्रामय मानले की मूल्यात्मकतेच्या गप्पा बंद होतात, हेही बघा --

म्हणूनच, मला असे दिसते की भूमिकावाले हे नुसता एक निराशावाद मांडत असतात !

वर्णव्यवस्था जाऊ द्या खड्ड्यात -- सगळ्यांनी सामील होणेही नको -- मग काय, ते तुमचे बोला -- नुसता निराशावाद मांडून काय उपयोग ?

हजारो वर्षांची उत्क्रांती, आनुवंशिकता, अनेक संबंध आणि परिस्थिती यांच्या प्रभावयुक्ततेतून माणूस जगत असतो. ही प्रभावयुक्तता प्रत्येकाची वेगवेगळी असते. त्यामुळे, प्रत्येकाचे जगणे वेगळे आणि अलग असते. त्यातूनच व्यक्तिकेंद्रितता, सुखेच्छा आणि वर्चस्वाची इच्छा हे सर्व येते. संघर्ष आणि हिंसा तसेच विषमता, अत्याचार आणि छळ हे निर्माण होतात. हे तर्कानेही पटणारे आहे आणि डोळे उघडून पाहिले तर सहज दिसणारेही आहे. समाज नावाचे मन अस्तित्वात नसते – समाजाला म्हणजे खूप व्यक्तींना मान्य असलेल्या नीतिकल्पना, मूल्यकल्पना आणि मुख्य म्हणजे क्रिया-प्रतिक्रियांच्या पद्धती या अस्तित्वात असतात. व्यक्ती ही प्रभावयुक्ततेमुळे वेगळीच असणे भाग असल्याने ती नेहमीच अशा सामाजिक कल्पनांशी सघर्षात असणे अटळ असते. त्या संघर्षातच व्यक्तीचे समाजाशी, परिस्थितीशी निगोशियेट करणे चालते. आक्रमण, माघार वा सहन करणे वा न करणे हे चालते. या सर्व घडामोडीत मूल्यात्मकता कसली असणार ? हे नुसते क्रिया-प्रतिक्रियांचे खेळ असतात. हे फक्त आत्मकेंद्रित पवित्र्यांचे जगणे असते. हे सर्व पवित्रे – यांतला प्रत्येक पवित्रा ही एक भूमिकाच असते. म्हणूनच, भूमिकांचे पुरस्कर्ते नेहमी म्हणत असतात की प्रत्येक माणूस कोणती ना कोणती भूमिका घेतच असतो. तरीही ते ‘ भूमिका घ्या ‘ असा धोशा का लावतात ? तर त्यांचे म्हणणे असते की ते म्हणतात तीच भूमिका घ्या ! हे न समजण्याइतके दुधखुळे कुणी नसतात. परंतु, प्रत्येकाची प्रभावयुक्तता वेगवेगळी असल्याने, अमुक भूमिका श्रेष्ठ वा सर्वाधिक हितकारक, असा निष्कर्ष काही निघू शकत नाही. मानवी जगण्याची हीच पद्धत अटळ म्हणून मान्य केल्यावर ‘ अनेक मूल्ये ‘ आणि त्यांचा संघर्षही अटळच ठरतो. अमुकच सत्य, असे म्हणता येणार नाही – हा उदारपणा त्या संघर्षमय मूल्यघर्षणातून म्हणजेच हिंसक मूल्यहीनतेतून येतो. या अशा बुद्धिप्रामाण्यातून मानवी संबंधांत समस्या निर्माण

होत राहतात पण त्यांची निराकरणे सापडू शकत नाहीत. हे सर्व जर दिसत – जाणवत असेल तर माणसाला प्रश्न पडायला हवा की मूल्य म्हणजे काय ? मूल्ये अनेक असतील तर त्यांच्यांतही संघर्ष होतील – तेव्हा मूल्यांतली श्रेष्ठ-कनिष्ठता कशी ठरवायची ? सगळी बोंबाबोंब मान्य करायची, गृहीत धरायची आणि आता आपण मूल्यात्मकतेबद्दल गप्पा मारू या, असे म्हणायचे – हे अर्थातच निरर्थकच ठरणार !

सांगणे म्हणजे काय ? व्यक्तिगत प्रतिक्रिया ? मरणकळ येईस्तोवर नुसते प्रतिक्रिया देत राहायचे ?

असा एकच नाहीय -- खूपजण आहेत -- त्यामुळे, बोलावे लागते. नुसत्या कालच्या एका दिवसात मी तीन उदाहरणे दिली.

अहो, अधिकारवाणी कुणाचीच नाही असू शकत -- तो ब्रेख्त का असे ना. चांगला लेखक हा स्वतःच्या चिंतनातून प्रगल्भ होत असतो. जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेत सर्वांनी सामील असणे वेगळे आणि ' अमुक करा ' म्हणून आक्रमकपणे सांगणे वेगळे !

इतर विचारसरण्या आल्या तरी साहित्य व्यापक होणार नाही -- हे तुमचे वाक्य काय सांगते ? कोणत्या तरी विचारसरणीनेच साहित्य निर्मिती होते -- असेच आहे ना तुमचे म्हणणे ?

तुमचे सुरुवातीचे प्रश्न सर्वांनाच प्रस्तुत असले तरी सातत्याने लेखकांचे ब्रेनवॉशिंग करण्याचा, हिंसक म्हणावा असा, प्रयत्न करणाऱ्या विचारवंतांना विशेष महत्त्वाचे वाटावेत, असे आहेत. या एकूण सर्वच प्रश्नांबाबत माझे आकलन मांडेनच.

धन्यवाद आणि प्रेम शिरसावंद्य !

बरोबर -- कोणता तरी अनुभव असतोच -- त्याला मर्यादाही असतात -- पण, तो अनुभव सांगणे एवढेच नसते मौल्यवान कलेचे काम --

भूमिका म्हणजे वैचारिक पठडी, असे होते -- कोणतीही पठडी न स्वीकारता प्रचंड आवाक्याचे लेखन होत असते -- तिकडे दुर्लक्ष होऊ नये --

भूमिका म्हणजे वैचारिक पठडी -- सगळेच साहित्य हे कोणत्या ना कोणत्या पठडीचे असते ?

मी लोड घेत नसून जे लोड निरर्थक लादले जातेय ते झुगारतोय --

त्यांच्यासारखे नसणे म्हणजे शेपूट घालणे ? किती संकुचित बोलताय --

तुम्ही वरचे सगळे वाचलेले दिसत नाहीय -- त्यांच्या विचरांनी त्यांनी जरूर चालावे पण इतरांचे ब्रेनवॉशिंग नको -- मराठीत हे फार प्रचंड प्रमाणावर चालू आहे, याचे तुम्हाला भान असेलच -- कोणत्या तरी विचारसरणीच्या प्रभावाखालीच साहित्य निर्मिती होते, ही तुमची कल्पना मुळातच चुकीची आहे.

स्पष्टच बोलायचे तर आज राजकीय क्षेत्रात हे नगण्य आहेत -- तरीही ब्रेनवॉशिंगचे इतके तीव्र प्रयत्न ! यांची सत्ता आली तर काय होईल ?

मराठीत हा एक कलावंतांना सल्ले देण्याचा सांसर्गिक रोगच पसरलेला आहे -- आजच्या पुणे लोकसत्ताची हेडलाईन -- " कलावंतांनो, राजकीय भूमिका घ्याच ! "

मुख्यतः ते धर्म कल्पनेवरचे नाटक आहे !

सगळ्यांनी कम्युनिस्ट वा समाजवादी विचारसरणीच साहित्यात राबवली पाहिजे -- ही काय भानगड ? साहित्याचा व्यापकपणा नकोय का ?

असू द्यात ना सगळे ! एकच आग्रह धरणे आणि लेखकांना सतत शिकवणे -- हे कशासाठी ?

मन समजण्यातच क्रांती असते, असे माझे आकलन आहे.

ज्यांना साहित्य, कला ही परिवर्तनाची साधने वाटतात त्यांना करू द्या ना ते -- पण, इतर सर्व टाकावू नका समजू ! पिरांदेल्लो, बेकेट यांनी स्पष्ट म्हटले आहे की ते सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तनासाठी लिहीत नाहीत -- आणि आयनेस्को ! याची काही समजच नसलेल्यांनी लेखकांना सल्ले का द्यावेत ?

'संघर्षाचा एक छोटास्सा टप्पा पार झाला... पुर्वीच्या 'सुयोग' पासून 'सुयोग' - न्यू जनरेशन पर्यन्त - आठ नाटकांचा प्रवास ! अभिनयाची पॅशन पाहून मुंबईच्या व्यावसायिक रंगभूमीने साताऱ्यातून 'हाक मारून'बोलावून घेतले... पहिली

आशयाचे भान जागृत असते -- याहून जास्त स्पष्टीकरण अवघड आहे --

तडजोड असह्य होईल का, हा ज्याचात्याचा विचार असणार ---

व्यावसायिक काम आवडीने होत असेल तर प्रश्न नाही -- ती तडजोड वाटली तर प्रश्न येईल --

योग्यच लिहिलेले आहे ! त्यातही, कलेचा उल्लेख दिसतोय म्हणून एक विचार करायला हवाच -- व्यवसाय म्हणून कलाक्षेत्र निवडणे आणि सर्जकतेलाच महत्त्व देणे यांतला फरकही लक्षात घ्यायला हवा. रोज पाट्या टाकायचे मान्य असेल तर तिथे काय आणि इथे काय ! इथल्या कमवलेल्या कौशल्याला बाजारमूल्य नक्कीच अधिक आहे -- तसे कलेत आहे का ? आणि आपल्याला कला म्हणजे काय, कसे करायचे आहे, याची पुरेशी क्लॅरिटी हवी. एन एस डी मध्ये शिकून येऊन इथे सीरीयल्स करत बसणे, बक्षिसे मिळवण्यासाठी सामाजिक बांधिलकीवाला होणे -- असले कलाक्षेत्र आपल्याला आवडणार आहे का, हा विचार हवाच.

नावीन्यपूर्ण दणका !

कशाला भेदभाव -- असेच वाटते शेवटी !

लोक बोलतील ते मराठी -- असे समाजगौरवाचे आहे सगळे !

नवे संमेलनाध्यक्ष काय म्हणाले त्याचा याला संदर्भ आहे -- आणि लेखकांनी कशासाठी लिहायला हवे, हे सांगणारे, हे कोण ?

-- आणि मग तीच सवय लागते -- माणूस त्याच विचारांचा होतो !

नवीन साहित्यसंमेलनाध्यक्षांचे भाषण याच प्रबोधनाचे असणार आहे !

जे सगळे ठरलेलेच आहे त्यावर कसला विचारविनिमय -- असा रोख आहे --

--- परकेपणा ---- झेंड्यासारखा --- खास !

'मध्यमवर्ग : उभा, आडवा, तिरपा'

काल, जामकर अण्णांचा परळी इथे दाजी पणशीकरांच्या हस्ते गौरव सोहळा झाला. त्या निमित्ताने कालच्या लोकसत्तेतही त्यांच्यावर एक स्फुट आले आहे. डॉ. प्रभुण्यांच्या निमंत्रणावरून आम्ही काहीजण एकदा उदगीरला गेलो होतो. तिथे नाट्यविषक काही बोलायचे होते. जामकर अण्णा हे प्रभुण्यांचे खास दोस्त ! प्रभुण्यांच्या घरी आम्ही पाहुणचार घेत असताना तेही तिथे आले होते. तेव्हा ओळख झाली होती. ते सर्व आठवत हा लेख वाचला -- छान वाटले ! मुलीला वाटणारे बापाचे प्रेम ही जगातली एक अजब गोष्ट आहे -- तो अनुभव मलाही आहे ! त्याच गोष्टीचा पुनःप्रत्यय वाटावा असा हा लेख वाचून छान वाटले !

मुस्लिम मुलगी, हिंदू मुलगा -- लग्न -- दोन्ही बाजूंनी संबंध तोडणे वगैरे -- बाळंतपणात मुलगी गेली -- मुलाच्या घरच्यांनी प्रेत स्वीकारले -- स्मशानात, सवाष्ण गेल्यानंतरच्या पद्धतीने अग्निसंस्कार केला -- तेवढ्यात मुलीचे नातेवाईक तिथे आले -- " अरे, आप ने तो उसे जला दिया -- उसे दफ़न करना था -- " म्हणाले !

मी खराच पार्लेकर आहे -- माझा जन्मच पार्ल्याचा !

त्यामुळे, मानवी हक्कांतली विषमता कायम !

उपरोधाने का असे ना --

ओशो म्हणतात, मूर्च्छेत जगणे म्हणजे पाप -- जागेपणाने जगणे म्हणजे पुण्य !

नवऱ्याची नखे वेळीच कापावीत ( आणि स्वतःची वाढवून धारदार ठेवावीत ) असे सुचवणारी पोस्ट पुरुषवादी ? पुरुष भोळा असल्याने त्याला कुणीही फसवते !

अनुभवाच्या मर्यादा कळण्यात असते कविता -- त्यामुळे, ती कोणत्याही अनुभवाच्या निमित्ताने येऊ शकते -- वाचन-लेखन यांचा रियाझही उपयोगी असतोच --

काहीसा चमत्कृतिपूर्ण सनसनाटीपणा, हे असावे कारण --

गृहीत केशेन इव मृत्युना -- असे काहीतरी आहे --

मनाचा असा सतत घाण वापर करूनही टुणटुणीत कसे राहतात साले, याचेच आश्चर्य वाटते !

झाले काम ! आता आपला मूळ विषय पुन्हा एकदा बघा की झाले !

एकेक मुद्दा घेत जाऊ. बाहेर समतेच्या चळव्वळीचा पाईक असलेला पुरुष घरात आला की स्वतःच्या बायकोला विषमतेने वागवतो -- यातली मानसिक दुही हे आपले वास्तव आहे. जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे माणूस वर्चस्वाने वागतो. तुम्ही म्हणता विषमतेला संपवेपर्यंत समतेचे तत्त्व उपयोगी पडते. तसे दिसत नाही. सदोदित वर्चस्वच हवे असते. जे सामाजिक दृष्ट्या विषमतेचे बळी नाहीत तेही कायमच वर्चस्वात राहू पाहतात. अलिकडेच ज्या दोन खटल्यांचे निकाल लागले त्यांबद्दल, जरा दबक्या आवाजात का असे ना, कसे नाराजीने बोलले जात आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. न्याय-व्यवस्था लाख निःपक्ष आहे पण बाहेर दहशतीने साक्षीदार फुटले, फोडले वा फितूर झाले तर कोर्ट काय करणार ? एकदा एखाद्या गटाशी समरूप होणे झाले की समता नव्हे, वर्चस्वच हवे असते. त्यामुळे, ' बोले तैसा चाले ' असे काही उपलब्ध नसते. ही माणसाच्या जगण्यातली एक अटळ शोकात्मिका आहे.

आदर्श आणि प्रत्यक्ष जगणे यांत सतत दुही असते, हे कुणालाही दिसू शकणारे आणि तर्कानेही पटू शकणारे असे सत्य आहे.

मूल्ये ही व्यक्तिनिहाय, गटनिहाय आणि स्थलकालपरिस्थितिनिहाय बदलणारी असतात, असे तुम्ही म्हणता. ही उत्तर-आधुनिक धारणा ' मूल्य ' ही संकल्पनाच उध्वस्त करणारी आहे. हे तुम्हाला अपेक्षित असावे, असे दिसत नाही. तुम्हाला तर आशावाद आवडत असावा, असे दिसतेय ! हीही एक मानसिक दुहीच !

आता तर दुहीच काय, विदीर्णतेबद्दल बोलले जातेय सगळीकडे. माणसाच्या मनाची वाट लागत चाललेली आहे. एकूणात मनोविकार वाढत जाणार आहेत, याबाबतची चिंता जगभर व्यक्त होतेय. व्यक्तिकेंद्रित वा समूहकेंद्रित असा मनाचा वापर हेच त्याचे प्रमुख कारण आहे.

विषमतेचे नमूने -- फॉर्म्स बदलू शकतात, पण, विषमता नष्ट होऊ शकत नाही -- हाच माणसाच्या मानसिक ढोंगीपणाचा सारांश आहे !

ॲड. उज्ज्वल निकम यांची मुलाखत पाहात होतो -- त्यामुळे, या विषयावर आता उद्या बोलेन --

समता हे मूल्य सर्वांना सारखेच मान्य नसण्याचे कारण आत्मकेंद्रित विचार हेच असते -- तिथे कसले प्रेमाचे प्रबोधन ? जसे व्यक्तिगत जीवनातल्या संबंधांतले संघर्ष तसेच सामाजिक जीवनातलेही. कलेतले लेखकाचे अवधान हे द्वेषाने प्रेरित असेल तर ती कला मूल्यात्मक असते का, असा प्रश्न आहे. समजा अमुक धर्माच्या लोकांनी तमुक धर्माच्या लोकांवर इतिहासात अन्याय केले -- त्या द्वेषातून निर्माण होणारी कला मौल्यवान असेल ?

याचा दुसरा अर्थ असा होतो की एक वेळ, अन्याय करणारे आणि अन्याय सहन करणारे यांचे समूह बदलत राहतील पण, अन्याय आणि विषमता कायमच राहतील !

माणूस हा स्वार्थीपणाने, नीचपणाने, हलकटपणानेच वागणार -- हा निष्कर्ष मान्य असेल तर अन्याय करणारेही बरोबर ठरतात -- मग, न्याय आणि समता यांच्या गप्पा मारण्यात काही अर्थच राहात नाही.

क्रिया, प्रतिक्रिया, पूर्वग्रह, राग, लोभ, द्वेष, सूड -- अशा प्रेरणांचा आणि समतेचा संबंध काय -- असा प्रश्न आहे -- कोणत्याही धर्माचा कट्टर अभिमानी समता निर्माण करू शकेल ?

ती चर्चा या ओघात होणारच -- या पोस्टच्या शेवटच्या ओळीच्या आधीचे सगळे मान्य असेल तर ती चर्चा सुकर होईल --

मग, ' सांस्कृतिक मूल्य म्हणजे काय ' -- या विषयावर मुंबई विद्यापीठाने परिसंवाद घ्यायला हवा ! किंवा येत्या साहित्य संमेलनात !

Chitra Rajendra Joshi's photo.

छान आहे लेख ! यातली संवेदनशीलता आणि समजून घेण्यासाठी लागणारा नम्रपणा -- हे आल्हाददायक वाटले ! ' निसर्गातील सजीवांचं अपरिहार्य साहचर्य ' आणि त्यातून येणारी एकमेकांबाबतची समजूत -- हे तुम्हाला या चित्रांतून जाणवले, याचा अर्थच तुम्ही ही चित्रे अत्यंत आत्मीयतेने आणि सजगतेने पाहिलेली आहेत ! तुम्ही उपस्थित केलेले प्रश्नही मोलाचे आहेत -- त्यांवर स्वतंत्र चर्चा व्हायला हव्यात. " दुसरा मला पडलेला प्रश्न, कोळीणींना कावळ्यांचा त्रास होत असेल ना? त्यावर तिने एक झोकदार ॲक्शन करून कोळीण कावळ्याकडे माशाचा तुकडा फेकून त्याला कशी दूर ठेवते हे

दाखवले. " -- हा तुम्हा दोन सौंदर्यवतींतला संवाद, जगण्यातला साधेपणा व्यक्त करणारा एक उत्तम नाट्यक्षण वाटला ! तुम्ही एक वाचक-प्रेक्षक म्हणून लिहिता आणि तरीही त्यात एक समजून घेण्याची तीव्र उत्कटता असते ! भल्याभल्या समीक्षकांकडेही या गुणाचा अभाव असतो ! यासाठीच तुमचे लेखन मी उत्सुकतेने वाचत असतो. धन्यवाद !

वर्चस्वप्रस्थापन आणि हिंसा यांशिवाय मानवी कृती शक्यच नसेल तर ' मूल्य ' आणि ' संस्कृती ' हे शब्द रद्दच करावेत !

अव्हान-प्रतिआव्हान या रूपात मौल्यवान कला असूच शकत नाही -- हे मूळ पोस्टमध्ये आहेच.

कलेची मूल्यात्मकता म्हणजे काय, यावर सर्वांनीच बोलायला हवे. तसे न करता, निवडणुकीतल्या राजकारणाला उत्तम कलेचा दर्जा म्हणू नये, असे वाटते.

दोनच प्रकार असतात का -- सामाजिक बांधिलकी नाही तर मनोरंजन ?

म्हणजे कलेनेही तेच काम करायचे ? समजा, मराठ्यांचे इतरांवर वर्चस्व ?

निर्विकारता ही बुद्धी आणि भान शाबूत राहून असते --

dull -- बुद्धी न चालणारा --

म्हणजे मद्दड समजा --

ज्ञातेपण खलास झालेला.

मासळी बाजारच काय, कलावंताने पाहिलेले कोणतेच वास्तव जसे च्या तसे वाचकाच्या वा रसिकाच्या परिचयाचे नसते. मुंबईचे अधोजग, वैमानिकाचे जीवन, ग्रामीण वास्तव, पंचतारांकित वास्तव, युद्धभूमीवरचे वास्तव, शेक्सपियर वा पिरांदेल्लो यांच्या नाटकांतले वास्तव -- हे सगळे अपरिचितच असते. ॲब्सर्ड नाटके वा काफ्काची ' ट्रायल ' यांतले वास्तव नवेच असते. हल्ली तर काहीजण म्हणतात की आजचे वास्तव इतके झपाट्याने बदलते आहे की त्याचे आकलन होणेच अशक्य झालेय ! कुणी असेही म्हटल्याचे वाचनात आले होते की इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र आणि शास्त्राची इतर अनेक शाखांतर्गत झालेली प्रगती -- यांचे भान असल्याशिवाय कलाकृती समजूच

शकत नाही ! मला तर वाटते की कलेतून संपर्क होणे हे इतके जिकिरीचे असेल तर वाचक-रसिक तिला फाट्यावर मारून निघून जातील ! मला असे दिसते की कलेत आलेल्या वास्तवापेक्षा तिच्यातून येणारे मानवी संबंधांचे आकलन वा भान हेच महत्त्वाचे असते. कलेतले वास्तव कल्पनेने पुरेसे समजून घेता यावे, इतकेच. अति-वास्तववादी कलेत कदाचित कल्पनेचा खूपच अधिक वापर करावा लागेल. पण, कला ही ' जगणे ' देण्यासाठी नसून ' जगण्याचे भान ' देण्यासाठी आहे, असेच मला दिसते. ते भान म्हणजेच परिपक्वता, तेच मूल्य आणि तीच संस्कृती.

आमच्या पार्किंगमध्ये कुणीतरी असा उतारा ठेवला होता -- सफाई कर्मचारी वा वॉचमन त्याला हात लावायला घाबरत होते -- मी जाऊन उचलून टाकून दिले --

या पोस्टमध्ये, उत्तर देण्याप्रमाणेच उत्तर न देणेही अनुस्यूत आहे का ?

आपले विचारस्वातंत्र्य जाऊ द्या -- पण, इतरांना सहिष्णुता दाखवण्याची संधी देण्यासाठी तरी व्यक्त व्हा !

Home - California Arts Association
calaa.org
होय -- तिकडचेच लोक करताहेत -- याचे बरेच प्रयोग तुमच्या दिग्दर्शनाखाली ' मिती-चार ' ने केले -- दिल्लीच्या भारंगम लाही आपण त्या वेळी जाऊन आलो !

Home - California Arts Association
calaa.org
तिकडे असेच लिहितात --

श्रेयाचे नेमके वाटप होणे अवघड आहे -- शेवटी जे समोर आलेय ते महत्त्वाचे -- आणि ते जसे आलेय त्यावर विश्वास ठेवावा ! त्याही पुढचे म्हणजे, मी समजा एखादी कविता लिहिली तरी तिच्यात माझ्या आधी लिहून गेलेले असंख्य लेखक-कवी असतात. आपण सर्व माणसे एकत्रच जगत असतो -- असेच पाहावे.

सॉरी -- तुम्हाला हे समजलेले नाही कारण सगळे बौद्धिकच असते ही तुमची पक्की समजूत आहे -- मृत्यूबद्दल काही

' माहीत ' होऊ शकत नाही, असे म्हटलेय -- हेच साध्या शास्त्रीय संशोधनाला तुम्ही लावू पाहताय -- तुमची यात दिशाभूल होतेय -- एक प्राथमिक सत्य -- माझ्या मृत्यूनंतरचे काही माझ्या अनुभवात येऊ शकत नाही -- हा साधा तर्कही तुमच्या पचनी पडत नसेल तर अवघड आहे !

महासत्य !

Ravindra Damodar Lakhe's photo.

तुम्हाला इतके भरभरून लिहायला उद्युक्त करणारे हे चित्रप्रदर्शन अत्युत्तमच असणार ! पुण्यात झाले तर मी अवश्य पाहीन !

गँग, बँक, चाँद, वगैरे -- आधी अक्षर पूर्ण करा -- उदा ब -- मग पूर्णविराम आणि कॅपिटल एम मारा आणि पुढचे अक्षर लिहा -- झाले ! हे फोनेटिक कीबोर्डचे सांगितले.

सामूहिकता आणि व्यक्तिगतता -- असे द्वंद्व आहे तुकारामात ?

तुकारामात समरूपता आहे ? तो तर म्हणतो, ' तुका टाकावा थुंकोन ' ! देवाच्या आगमनासाठी स्वतः पूर्ण रिकामे व्हायला हवे, असे तो म्हणतो !

आयनेस्को आणि बेकेट यांची सर्वच नाटके एकूणातच मानवी गधडेपणा उघडा पाडणारी आहेत -- तरीही, याच विषयाशी विशेष संबंधित म्हणून आयनेस्कोचे ' ऱ्हिनोसेरस ' हे नाटक वाचावे. मराठीत ' गेंडा ' या नावाने याचा प्रयोग पुण्यातल्या पीडीए या नाट्यसंस्थेने केला होता. ( त्याच संस्थेमार्फत अलिकडेच माझे ' जिंदगी ख्वाब है ' हे नाटक रंगभूमीवर आलेले आहे. )

कोणताही सामाजिक सनसनाटीपणा न करता अनेक ॲब्सर्ड नाटकांनी अशा समरूपतेच्या जगण्याची चिरफाड केलेली आहेच !

सत्य (truth ) हे घटनांच्या स्तरावरच असते, असे नाही --

मैत्रीण असणे महत्त्वाचे -- नावात काय आहे ? !

आणि मोठमोठ्या इतिहास संशोधकांत वाद असल्याचे दिसते -- त्यातूनही सगळ्यांना पटणारा विवेकाचा मार्ग निघेल का ?

हे सगळे लेखकानेच करायचे का ?

सुमारे ५० वर्षांत विवेकाचे मार्ग सापडले समजा, तरी, तोवर सगळा माहोलच बदललेला असणार ! सापडलेले विवेकमार्ग अप्रस्तुत ठरणार !

म्हणजे आधी ते योग्य प्रयत्न होइपर्यंत लेखकाने लिहायचे नाही !

केंभावीजींचा बौद्धिक परिश्रमांवर खूपच विश्वास दिसतोय -- ते तर जगभर फेल गेलेत !

अहो, शिवाजी, राम, महंमद, आंबेडकर, ख्रिस्त ही पात्रे घेऊन मला एक ॲब्सर्ड नाटक लिहायचेय -- इतिहासाशी प्रामाणिक वगैरे अजिबात नसलेले -- ते मी लिहायचेच नाही ?

तुम्ही भूमिका घेऊन काही सत्य मांडता येते का पाहा -- चांगली कला ही कोणत्याही भूमिकेला जुमानणार नाही --

मतांप्रमाणे बुद्धी वळवली जाते आणि नुसत्या निष्फळ मारामाऱ्या होतात --

ही सगळी तत्त्वे हिंदुत्ववादात सर्वाधिक आहेत असे एकजण म्हणतो तर कम्युनिझममध्ये सर्वाधिक आहेत, असे दुसरा म्हणतो !

माझ्या मते या प्रश्नाचे अंतिम उत्तर असूच शकत नाही -- कोणतीही उदाहरणे घेऊन कितीही चिकित्सा करा --

विवेकवाद म्हणजे काय, हे कुणी ठरवायचे ?

पूर्ण कलाकृती इतिहासाची मोडतोड मागत असेल तर तीही होणारच -- काल्पनिक प्रश्न घेण्यात अर्थ नाही -- शेकस्पियरने इतिहासाची खूप मोडतोड केलेली आहे, असे म्हणतात. समाजाची बंधने म्हणजे त्या त्या वेळी बलवान असणाऱ्यांची बंधने. ती विचारात घेऊन मौल्यवान कला निर्माण होत नाही.

वरील चर्चा वाचली. कलेचे प्रमुख कार्य, मला वाटते, जगण्याचे समग्र भान म्हणजेच परिपक्वता देणे. म्हणजे तरी काय तर एकच मत वा एकच भूमिका यांतून न पाहता -- कशालाही कंडेम न करता वा कशाचीही भलावण न करता ' पाहणे '. हे तरी का महत्त्वाचे ? तर एका एका प्रोग्रामिंगमधून जगणे हे संघर्षमय आणि हिंसक असते -- ते मूल्यात्मक नसते, म्हणून. एरवीच्या जगण्यात माणसे शिवाजी, राम, महंमद, आंबेडकर, ख्रिस्त यांच्याशी तसेच कम्युनिझमशी, हिंदुत्ववादाशी वगैरे समरूप होऊन जगत असतात. मूल्यात्मक कला ही अशी कुठे समरूप ( identify ) होत नसते. याच मूल्यात्मक शक्यतेच्या अस्तित्वात येण्यासाठी कलेला बंधने असून चालणार नाही. कलेला बिनशर्त स्वातंत्र्य लागेलच !

कोणतीही मानसिक सवय कलेत तपासली जावीच ! परंपरा वा मानसिक सवयी गृहीत धरणारी कला ही फक्त करमणुकीची कला असते.

शक्य तो वादग्रस्त असलेले बरे -- नाही तरी ग्रेट काही पाहायला मिळणारच नसते !

म्हणजेच, शब्द आणि भाषा मर्यादित असतात -- त्यात परिपूर्ण असे काही असू शकत नाही --

इंग्रजी भाषा जगभराचे पाणी पिऊन आली पण ती आपला संसार करतेच ! प्रत्येक गोष्टीला अडचणी काढून सगळेच खोडत गेल्यास काहीच उरणार नाही ! शब्द, भाषा हे अर्थ व्यक्त करण्यासाठी असतात -- खुद्द अर्थ नसतात -- ही मर्यादा जगातल्या सगळ्याच भाषांना असते -- असणार !

लोक बोलतील ती भाषा -- शुद्धबिद्ध काही नसते -- हेही मान्य, एक वेळ -- अरे, पण, शेवटी एक प्रमाण भाषा -- काही शिस्त, नियम लागतीलच -- नाही तर भाषेची संपर्कशक्तीच खलास होईल -- हेही बहुजनसमाजाने लक्षात घ्यायला हवे !

म्हणजे आहेत भुते ! बाप रे !

संस्कृती विनोदाच्या तावडीत गेली कित्येक वर्षे आहे !

अहो, पंचेंद्रियांचे पुरावे -- हाच तर विषय आहे -- शोध घ्यायला कुणाची बंदी आहे ? नुसतेच एकमेकांना भ्रामक म्हणायची हुशारी काय कामाची ?

दुर्दैवाने ही वृत्ती अनेक रूपांत अनेक समूहात विभागलेली पण, एकसारखीच तीव्र आहे ! त्यामुळे, तेरावे घालायला माणसे कोणती येणार हाच प्रश्न आहे !

जेव्हा क्लॅरिटी येते तेव्हा शब्दांचे वाद फिजूल होतात आणि बुद्धीने क्लॅरिटी येत नाही, असे म्हटलेय --

मानवी संबंधांतले वा देशादेशांतले प्रश्न शक्ति-अंदाजावर काहीसे सुटतात -- बुद्धीने बरोबर काय ते ठरते आणि ते सर्व संबंधितांना मान्य होते, असे कुठे दिसत नाही -- बुद्धीवर तुमची श्रद्धा असावी, असे दिसतेय --

बुद्धी ही कंडिशनिंगवर -- प्रोग्रामिंगवर चालते -- ती एकरेषीय आणि तुकड्यांची असते -- असे सगळ्यांचेच असल्याने फूट पाडणे -- संघर्षमयता -- हीच बुद्धीची वैशिष्ट्ये असतात -- बौद्धिक विश्लेषणाने मानवी संबंधांचे प्रश्न वा देशादेशांतले प्रश्न सुटत नाहीत -- अमुक बरोबर हे पूर्ण मानवजातीच्या दृष्टीने बुद्धीने काही ठरू शकत नाही -- कोणते शब्द वापरावे, त्यांचे अर्थ काय असावे यावरही एकमत होऊ शकत नाही --

बंधने कसली आहेत, तर प्रभावीकरणाची, अनुभवाची, समरूप होण्याची. त्यांमुळे काय होते ? तर ताणतणाव, दुःख आणि हिंसा निर्माण होतात. त्यामुळे, या मर्यादा ओलांडण्याचे, या हिडीस जगण्यातून बाहेर पडण्याचे महत्त्व माणसाला वाटणे साहजिकच आहे. त्या दलदलीच्या क्षेत्रात वावरण्याचे माणसाचे साधन कोणते असते तर बुद्धी आणि तर्क -- काहीजण गौरवाने त्याला विवेक म्हणतात. माहिती, शास्त्र, तंत्रज्ञान यांत बुद्धीच महत्त्वाची असते, पण, मानवी संबंधांत ती समस्या निर्माण करणारी आणि त्या सोडवण्याच्या बाबतीत कुचकामी असते. इहवाद्यांना बुद्धीचे आणि तिच्या, काही क्षेत्रांत असणाऱ्या नेमकेपणाचे सर्वव्यापी महत्त्व वाटत असते. हे त्या क्लेषकारक आणि हिंसक क्षेत्रातच घडत असते. या क्षेत्राबाहेर पडणे हे बुद्धीच्या मर्यादेबाहेर पडणे असते म्हणजेच ते आपण ज्याला बौद्धिक नेमकेपणा म्हणतो, तसे नसते. त्यामुळे, एलकुंचवारांनी ' धूसर ' हा शब्द वापरला असावा. कलेत वा सर्जकतेत असणारे भान ते हेच. हा सर्वसमावेशक जिवंतपणा असतो. तसे पाहिले तर बुद्धीच्या पलिकडची क्लॅरिटी असणे, निरामय समज असणे, असे याला म्हणता येईल. मग, शब्दांचे वाद फिजूल ठरतील.

म्हणजे ताण घालवणारी दोन साधने तिथे उपलब्ध असतात !

जेव्हा जेव्हा प्रयोग असतील तेव्हा तेव्हा इथे फ्रेंडससाठी जाहीर करेनच--

त्यामुळे, रामचंद्र वामन कदम सारखा जिनियस कवी कुणाला माहितीच नाहीय !

छानच कल्पना ! फ्रेंडचे नाव टाकून पुढे फिशपाँड -- ही एक पद्धत असावी आणि आणखी एक पद्धतही चालेल -- कोणत्याही चालू असलेल्या चर्चेत, मध्येच ' फिशपाँड ' असा उल्लेख करून तो कधीही देणे !

“Hell is—other people!”
— Jean-Paul Sartre, No Exit

आयला, कमाल आहे ! सलाम ! महाराज पोचले गडावर -- आता मी जायला हरकत नाही !

हिंदी गाण्यांचा गोल्डन पिरियड ! अगदी खरे !

मिलिंद, तो एक नोकरदार माणूस आहे -- असा त्याला गाळात नको घालूस -- त्यापेक्षा एकदा संध्याकाळी भेटा --

एकच नाव देऊन एकावरच अन्याय नको रे --

अब मेलडी खाओ और खुद जान जाओ !

आधी ती ब्लँक होईल आणि मग तो ब्लॉक होईल !

संस्कार हा शब्द इथे conditioning -- परिणामबद्धता -- या अर्थाने वापरलेला आहे.

खुद सोचो और खुद जान जाओ --

सुचले ते सगळेच दिलेय -- दोन्ही --

तो झाला एका सवयीचा दुसऱ्या सवयीला शॉक -- आपण बोलतोय तो म्हणजे कोणत्याही सवयीच्या असण्यालाच -- म्हणून समूळ -- शॉक !

बहुसंख्य लोकांची होण्याची, मिळवण्याची, यशस्वी होण्याची, मान्यता मिळवण्याची प्रक्रियाच चालू असते -- असे नसलेले क्वचित --

सवयीतून समूळ उखडणे हेच महत्त्वाचे --

तसे नाही -- लिहिणे हे त्या कवीचे जगणे असेल -- कुणी ही कविता वाचेल आणि कुणी ती --

' जाता नाही जात ' हे नाटक लिहिणारा ( सिद्धार्थ तांबे ) -- निर्मिती 'आविष्कार ' -- दिग्दर्शक, गिरीश पतके.

हा निसर्गाचा बुद्धिप्रामाण्यवाद !

थक्क करून अचंबित करून गप्प करणारे निसर्गचक्र !

खरे आहे -- बौद्धिकता आणि आकलनाची अमूर्त तत्त्वशीलता !

१ चांगली साहित्यकृती – महाकाव्य – म्हणून पठाऱ्यांनी महाभारताचे उदाहरण दिलेले आहे. त्याचे कारण देताना त्यांनी असे म्हटले आहे की, बरे-वाईट, सुष्ट-दुष्ट वगैरे मूल्यनिर्णयाचे सर्व पदर त्यात खुले ठेवलेले आहेत. म्हणजेच निष्कर्षात्मक आकलन मांडलेले नाही.

२ आणखी उदाहरणे त्यांनी संत वाङमयाची दिलेली आहेत. ज्ञानेश्वर, तुकाराम, गालिब अशा कवींचे आपण वंशज आहोत, असे म्हटले आहे. त्यांना त्यांनी विशालहृदयी म्हणून मूल्यात्मकताही दिलेली आहे. त्यांचेही लेखन वैचारिक निष्कर्ष सांगण्यासाठी नव्हतेच – हे आपण जाणतोच. त्यांच्या लेखनाचा गाभा हा माणसाच्या समग्र जीवनाचा आवाका घेणारा होता आणि त्यामुळेच ते आजही प्रस्तुत ठरतात, हे उघडच आहे.

३ परंतु, पठाऱ्यांनी मांडलेली भूमिका ही याला पूरक नाही. वर्तमानकाळाला प्रतिक्रिया देणे, हे त्यांनी साहित्याचे प्रमुख कार्य मानलेले आहे. मुळात वर्तमान काळ असे एकच काही असते का, हा विवाद्य भाग सोडून देऊ. तरीही कोणतीही वैचारिक प्रतिक्रिया ही समग्र भानापेक्षा विशिष्ट व्यक्तीच्या वा समूहाच्या हिताला महत्त्व देणारी असते, हे नाकारता येत नाही. कोणतीही प्रतिक्रिया ही मर्यादित आणि संघर्षमय आणि पर्यायाने हिंसकच असते, हे पाहायला हवे. प्रतिक्रिया ही

वर्चस्ववादीच असते. त्यामुळे, आपल्या विरोधातील प्रतिक्रियांचे दमन करायचा प्रयत्न करणे हे तीत अध्याहृतच असते. माझी प्रतिक्रिया दमन झाली की मी स्वातंत्र्यासाठी ओरडायचे आणि दुसऱ्याची दमन झाली की त्याने ओरडायचे – हेच जगभर चालू असते. सर्व दुःखांचे, विनाशाचे, हिंसेचे मूळ या प्रतिक्रिया-गौरवातच असते. त्याला मूल्यात्मकता कशी बहाल करणार ?

-- सारांश, मूल्यात्मक नसलेल्या अशा वैचारिक मांडणीला मूल्यात्मक उदाहरणे देऊन इथे दिशाभूल होते आहे, असे मला दिसते.

धार्मिकवाले त्या प्रश्ना ऐवजी दुसरे काही करतात तर बुद्धिप्रामाण्यवाले तो प्रश्नच नाकारू पाहतात -- त्या प्रश्नाला सामोरे जाणे महत्त्वाचे आहे.

धार्मिकवाले म्हणणार अमुक पारायण करावे आणि बुद्धिप्रामाण्यवादी म्हणणार, हा प्रश्न अध्यात्मिक होईल -- द्या सोडून !

माझ्या आठवणीप्रमाणे सुहास हा सुरुवातीला कै. विनायक पडवळच्या ग्रुपमध्ये होता. विनायकच्या दिग्दर्शनाखाली त्याने माझ्या ' समुदाय ' या एकांकिकेत प्रमुख भूमिका केली होती. ( सुहास पळशीकर ).

हल्ली प. बंगालमध्ये पक्षाने अधिकृतपणे त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगितले आहे की स्थानिकांच्या सर्व धार्मिक कार्यक्रमांत--- उत्सवांत सहभागी व्हा !

माझ्या आख्ख्या पोस्टच डबल होत होत्या -- त्या मानाने तुम्हाला काहीच झालेले नाहीय ! दुसरे म्हणजे कुणाला तरी विचारून खात्री करून घ्या की बाबा खरेच कॉमेंटस डबल येताहेत की तुम्हालाच डबल दिसताहेत --

माणसाला शहाणा करणे हे शनीचे काम ! मला त्याने पूर्ण शहाणा केलेले आहे ! आता पुढील तीस वर्षे -- म्हणजे, मरेपर्यंत हे शहाणपण पुरेल !

मोतीलाल हा एक महान नट होता --

कबीर म्हणतो --
राम हमारा जप करे ।
हम बैठे आराम ।।

एक लाखभर यंत्र-स्त्री-पुरुष तयार करावेत आणि पूर्ण मानवजातीने समाधी घ्यावी ! पृथ्वीचे भले होईल !

देशाबाहेर कुणी भारत म्हणत नसावे -- इंडिया किंवा हिंदुस्तान -- त्यांतले इंग्रजी पुढे रद्द होऊन हिंदुस्तान राहील, असे दिसते !

या दोन्हींबरोबर मला, शिवाय, कारलेही आवडते !

गालिब तर उर्दूतला तुकाराम म्हणावा इतका ग्रेट आहे !

कोणतीही चांगली कलाकृती ही स्वांतःसुखाय लिहिली जात नाही -- तो गंभीर मूल्यशोध असतो --

हल्ली मधे पडणाऱ्याला पोलीस पकडून नेतात आणि " तुम्ही तिकडे कशासाठी गेला होता " अशी चौकशी सुरू करतात !

फ्रेंडस, सातत्याने या प्रकारचे लिहिणे मला शक्य होत नाही कारण माझेही काही लेखन चालू असते. तरीही, समोर काही ' विशेष ' आले की मी तुम्हाला सांगतोच.

आनंद थत्त्यांचा न-दिवाळीअंक न वाचल्याने खूप आवडला !

त्यांनी ३० वर्षे ' वेटिंग फॉर गोदो ' का केले यावर काहीच नाही ! एकदा ते म्हणाले होते की त्या नाटकाच्या प्रत्येक प्रयोगात नवे काही कळते ! लमाणाने वाहून न्यायचा नेमका मालच माहीत नसतो का, याचा अर्थ ?

शिवाय, नट हा लेखकाचा लमाण असण्याची बाद कल्पना !

असण-नसणे, भास-सत्य, श्रद्धा-अश्रद्धा -- यांचा सर्व गुंता ' पाहणारी ' ' दर्शन ' ही कविता अत्युत्तम आहे !

याचा अर्थ न पटणारी साखळी स्वीकारायची, असा मुळीच नाही -- ते तर वेडेपणातच जमा होईल --

तोही चालेल -- कुणी म्हणेल ' कण-भास ' म्हणा, तर तेही चालेल -- खेळ महत्त्वाचा !

यात मी काही मतदार नाहीय, पण, तुम्हीच व्हायला हवेत अध्यक्ष अशी मनोमन इच्छा मात्र आहे ! खूप शुभेच्छा !

एक आहे ते पीडीए कडून बसवले जातेय --

बसवणारा नवीन म्हणजे वेगळा असला की नवीनच होणारे असते माझे नाटक ! ते एकरेषीय नसल्याने एकच नाटक नसते !

आपले वर्चस्व राखण्याचे सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न -- हा विषय महत्त्वाचा आहे --

माणसांना संपवण्याची वारकरी काँग्रेसी मराठी पद्धत वेगळी आहे -- असे तुम्ही म्हटले आहे -- ते कौतुकाने की त्यांच्या पद्धतीला कंडेम करत ? की माणसांना संपवण्याची चिनी वा कम्युनिस्ट पद्धतच आदर्श, असे तुम्हाला म्हणायचे आहे ?

त्या विचारसरणीच्या माणसांना ग्रेट वाटणे वेगळे -- एकूण माणसाला महत्त्वाचे -- मौलिक वाटावे, असे त्यात काय आहे, ते जरूर सांगा --

‘ उध्वस्त धर्मशाळा ‘ हे मानवी प्रश्नांचा आवाका घेणारे नाटक नसून एक बाजू घेणारे भाबडे नाटक आहे -- असे माझे म्हणणे आहे -- तसे नाहीय ?

आपल्या राजकीय विरोधकांना संपवत जाणे -- हा आहे विषय --

तुमचे म्हणणे पुर्ण मान्य ! तशा चुकीच्या आणि बावळट समजुतीतूनच काहीजण म्हणतात की मध्यमवर्गीय लेखक चांगली कलाकृती निर्माण करू शकत नाही ! मग, माझा प्रश्न असतो -- मग, सर्वांत अधिक वाईट आणि संकटग्रस्त जगणारे कोण, ते सांगा -- त्यांच्याकडूनच येतील चांगल्या कलाकृती !

सकस समीक्षेची उणीव का आहे, याचीही चर्चा व्हावी -- कदाचित त्यातूनही काही अर्थपूर्ण सापडू शकेल --

गेल्या १ ऑगस्टला मी मंटोबद्दल एक पोस्ट दिली होती -- ती अशी होती --
status.

सआदत हसन मंटो

" फाळणीनंतर दोन-तीन वर्षांनी पाकिस्तान आणि हिंदुस्तान सरकारच्या लक्षात आलं की साधारण कैद्यांप्रमाणे वेड्यांचीसुद्धा अदलाबदल व्हायला हवी. म्हणजे जे मुसलमान वेडे हिंदुस्तानच्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना पाकिस्तानला पोहोचवायचं आणि जे हिंदू आणि शीख पाकिस्तानच्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना हिंदुस्तानच्या ताब्यात द्यायचं. " -- ही आहे मंटोच्या ' टोबा टेकसिंह ' या कथेची सुरुवात. ( अनुवाद – डॉ. वसुधा सहस्रबुद्धे – ' अक्षर वाङमय ' – एप्रिल ते जून २०१५. ) मानवी मनाचा ' उत्तुंग ' गधडेपणा फक्त ७-८ पानांत इतका उघडा पाडणारी दुसरी कथा सापडणे अवघड आहे. मंटो म्हणतोच असे की तो सत्य वेधण्यासाठीच लिहितो.

मंटोच्या अनुवादित कथांचा एक संग्रहही मी नुकताच वाचला – ' एक होती राधा ' -- अनुवाद – चंद्रकांत भोंजाळ – अक्षर प्रकाशन. त्यातल्याही कथा अशाच मानवी जगण्यातल्या अनेक गुंतागुंतीच्या रचना उघड्या पाडणाऱ्या आहेत. माणसाच्या मनाच्या सूक्ष्म प्रक्रियांचे आणि त्यातून घडणाऱ्या संबंधरचनांचे पूर्ण भान व्यक्त करणाऱ्या या कथा आहेत. या कथांतली पात्रे मुख्यतः वेश्या, त्यांचे दलाल, गिऱ्हाइके अशी असली तरी त्या कथा तेवढ्या समूहांचेच जगणे, अशा मर्यादित राहात नाहीत. त्यांतली सुखदुःखे, मानापमान, नाइलाज हे सर्व आपलेही असल्याचे जाणवते. मंटो हा एखादी वैचारिक भूमिका घेणारा वा विद्रोही टाईप लेखक नाही. तो त्याच्या कोणत्याही पात्राला कंडेम करत नाही वा कुणाचेही उदात्तीकरण करत नाही. किंवा, " मी तळपती तलवार आहे – उद्याचा सूर्य तुम्हाला खतम करेल " असला उद्रेकी आवाजही त्याच्या कथा करत नाहीत. वेश्यांचे वा इतर उपेक्षितांचे जगणे हे या कथांचे अनुभवद्रव्य आहे कारण मंटोला ते जग अंतर्बाह्य माहीत आहे. एखाद्या वेश्येला काय वाटते ते तो किती सखोलपणे दाखवतो, ते पाहा – " सुगंधी आपल्या तोऱ्यातच असे. पण जर कुणी आपलेपणानं बोलला तर लगेच विरघळत असे. तसं स्त्री-पुरुषांचं शारीरिक मीलन तिच्या दृष्टीने अगदीच निरर्थक होतं. त्यात तिला अजिबात गंमत वाटायची नाही. पण शरीराचे इतर अवयव खूप कुस्करले जावेत, पुरुषाने आपल्या शरीराशी केलेल्या झोंबाझोंबीत आपण थकून जावं असं तिला वाटे. अशा थकव्यानंतर येणारी झोप तिला खूप प्रिय होती. अशा झोपेमध्ये कधी तुम्ही आहात तर कधी नाही आहात असं वाटतं. असण्यानसण्याच्या या जाणिवेमध्ये कधीतरी तुम्ही हवेत उंच जागी लटकत आहात असाही भास होतो. वर-खाली, आजूबाजूला फक्त हवेचं अस्तित्व जाणवत राहतं. ह्या हवेतही श्वास अडकायला लागतो. पण ती अवस्थाच मोठी छान असते. "

त्याच्या व्यक्तिगत जीवनात मंटो डाव्या विचारसरणीचा होता अशी माहिती दिसते पण तो कोणत्या एखाद्या चळवळीचा भाग होता का, ते काही समजले नाही. अनुभवद्रव्य उपेक्षितांचे असले की त्या लेखकाला बांधिलकीवाला म्हणायचे, इतरांना कलावादी म्हणायचे – हे फारच ढोबळ विचार कधी कधी दिसतात. अनुभवद्रव्य कुठलेही असले तरी मानवी जगण्याचा सखोल वेध घेणे हीच ज्यांची सर्जकता असते असे मंटोसारखे लेखक ते भेद ओलांडून वाचकांना जगण्याच्या प्रक्रियांबाबत

सर्वांगीण सजग करतात. यामुळेच मंटोच्या कथा सर्वच माणसांना प्रस्तुत ठरतात. यासाठीच तो एक महत्त्वाचा, मौल्यवान लेखक ठरतो.

आता चुकीची दुरुस्ती पुढल्या दिवाळी अंकात जाहीर होईल !

तेही ठीक -- नशेत योग्य तेच कसे घडणार ?

रामानंद सागर की जय हो !

कुणीही त्याची शेपूट पिरगाळायची हिंमत करू शकत नसे -- यावरून !

स्त्री-प्रेमाला वंचित राहूनही तो उंच उड्या मारत असे, म्हणून !

Is suffering merely a word or an actuality?

Is suffering merely a word, or an actuality? If it is an actuality and not just a word, then the word has no meaning now, so there is merely the feeling of intense pain. With regard to what? With regard to an image, to an experience, to something which you have or have not. If you have it, you call it pleasure; if you haven't it is pain. Therefore pain, sorrow, is in relationship to something. Is that something merely verbalization, or an actuality? -as fear cannot exist by itself but only in relationship to something: to an individual, to an incident, to a feeling. Now, you are fully aware of the suffering. Is that suffering apart from you and therefore you are merely the observer who perceives the suffering, or is that suffering you?

J. Krishnamurti, The Book of Life

खूप सविस्तर सांगता येईल -- पण, मनाची संघर्षमय अवस्था म्हणजे दुःख -- त्रास होणारी, स्वास्थ्य घालवणारी, म्हटले तर हिंसक अवस्था -- हेच दुःख -- हे दुःख नसेलच जगण्यात तर कशाला उगीचच व्याख्या करत बसायचे ?

वा ! खूप विचारपूर्वक लिहिलेले आहे ! या निमित्ताने असे वाटते की आता वाचकांनीच समीक्षक व्हायला हवेय -- आपापले आकलन मांडायला हवेय. मराठीत एक तर समीक्षक नाहीत वा असले तर खुले नाहीत -- गटबाजीत दफन झालेले आहेत ! त्यामुळे, योग्य समीक्षेचा अभाव भरून काढणारे असे लेख येत राहावेत !

महत्त्वाचा विषय ! याचे शेकडो प्रयोग होवोत, हीच दणदणीत सदिच्छा !

हिंदुत्ववाद वाईट पण जातवाद चांगला -- हेही तसेच एक गटारी लॉजिक ! मानवी संबंधांत लॉजिकचे असे शेकडो उपयोग आहेत ! सगळेच लोक असे उपयोग करत असतात --- त्यांतल्याच काहींना पुरोगामी आणि काहींना प्रतिगामी म्हटले जाते ! हेही लॉजिकमुळेच घडते !

आजूबाजूचे प्रदूषण आपल्या कुवतीप्रमाणे कमी करण्याचे प्रयत्न, इतकेच !

माणसाने फार वाचायची गरज नसते -- ही एकच कविता नीट वाचली तर पुढे काही महिने काहीच वाचले नाही तरी चालेल ! एक तरी ओवी वा कविता समजून घ्यावी, या विभागातल्या अपवादात्मक कवितांपैकी ही एक कविता आहे ! तिळव्यांना नाही -- या कवितेलाच सॅल्यूट !

' वळू ' २००८ चा सिनेमा होता. त्या वेळी मी इथे फेसबुकवर नव्हतो. कुठे लिहिले ते सापडले नाही. पण, माझा मुद्दा असा होता की त्या चित्रपटाची कल्पनाच चुकलेली होती ! त्या भयानक वळूच्या कारनाम्यांमुळे घाबरलेले गाव. यात गंमत अशी होती की चित्रपट विनोदी करायचा हे आधी ठरलेले होते, मग, त्या वळूची हिंसा कशी दाखवणार ? त्या वळूने भोसकून मारलेली, जखमी केलेली, तुडवलेली माणसे दाखवली तर चित्रपट विनोदी कसा करणार ? यावर उपाय म्हणजे त्यांनी त्या वळूची भीती फक्त लोकांच्या बोलण्यात ठेवली. एरवी त्याची गरीब गाय करून टाकली ! तो नुसता इकडून तिकडे जाताना वा कुठेतरी गुमान उभा असलेला दिसे ! पण, त्याची हिंसा अगदीच शून्यावर कशी ठेवणार ? त्यावरही त्यांनी उपाय काढला ! त्यात एक वयस्कर माणसाचे पात्र घेतले -- ते काम चंद्रकांत गोखले यांनी केले आहे. तो माणूस असा आहे की नुसता जरा जोराचा वारा जरी आला तरी त्यानेही तो पडून मरून जावा ! तर तो माणूस एका ठिकाणी मेलेला सापडतो ! त्याला त्या वळूनेच मारले असे सांगितले जाते ! म्हणजे, फारसे कुणी मनावर घेऊ नये असा प्रकार ! पण, चित्रपट खोटा पडतोच ! मूळ कल्पनाच चुकण्याचे तो चित्रपट म्हणजे एक भारी उदाहरण होते !

' वळू ' वर इथे मी सविस्तर लिहिले होते -- आता पुन्हा नाही लिहीत --

साधा धर्म नाहीच -- फक्त आपद्धर्म !

कवीला वा लेखकाला जाणीवपूर्वक शब्दांचा इतिहास-भूगोल वा व्युत्पत्ती माहीत नसते -- पण, त्याच्या मनात टिपल्या गेलेल्या भाषेतून तो शब्दांचा वापर योग्य प्रकारे करत असतो -- असो -- सारांश, मला तो शब्द बदलायची आवश्यकता नाही --

साहित्य म्हणजे क्रांतीसाठी वापरायचे शस्त्र -- यावर तुमचे काय विचार आहेत ?

बुद्धाच्या ' निर्वाण ' संकल्पनेवर बाबासाहेबांचे काय विचार होते ?

मी वाचत असतो याची कृपया नोंद असावी !

' स्वछळ ' ठीक आहे पण इतर दोन शब्द माझ्या डोक्यात कुठून आले ते मलाही नाही आठवत -- ते शब्द शब्दकोशात दिसत नाहीत --

मला ही कवित नीट पोचली नाही -- का ते सांगतो -- ' खोल मातीत ' किंवा ' काळ घेऊन ' हे भूतकाळाचे वा मानसिक काळाचे दर्शक शब्द आहेत -- त्याला अबोध मनही म्हणता येईल -- तिथे खणत जाण्याने स्वस्थता कशी येईल ? -- मन थकून बधीर होऊ शकेल, पण, स्वस्थ नाही होणार. मग, हा कवी ' स्वस्थ बसलोय ' असे का म्हणतो आहे ? हे उपरोधिक वा भ्रमात्मक असल्याची कोणतीही सूचना दिसत नाही -- त्यामुळे, शेवटच्या दोन ओळी मला पोचत नाहीत -- पर्यायाने कविताच पोचत नाही. असे होऊ शकते. कुणीही ' अधिकारी ' नसतो -- मीही नाही -- पण, मला नाही पोचली ही कविता.

कृपया यातल्या उपरोधासह वाचा --

पोस्ट मधला शेवटचा कंसही पाहावा. यात उपरोध अपेक्षित आहे.

Nothingness also is something ! -- हे तर सार्त्रला एका मिनिटात सहज मातीत घालेल !
( भूमिका नसणे हीही एक भूमिकाच – या चालीवर ! )

अन्यथा तीही लुटून बुडाखाली घेऊन बसले असते जातिवंत अप्पलपोटे !

प्रत्येक मन चिरफाळलेलेच असते !

पुण्यातही माणसे आणि वाहने भरमसाट वाढताहेत आणि रस्ते तेच तेवढेच अरुंद आहेत !

नाही -- समजा माझ्या वेबसाईटवरून कुणाला संदर्भासाठी काही ओळी कॉपीपेस्ट करायच्या असतील तर ते होत नाहीय --

Edit

Champra Deshpande replied to Sandeep Godbole's comment.

Sandeep Godbole mAjhyAkaDe mAjhyA vebasAItace kOEpIhI hot nAhI -- पेस्ट होतेय का बघा --

Edit

Champra Deshpande replied to Ramchandra Ambradkar's comment.

Ramchandra Ambradkar pIsI -- XP --

Edit

Champra Deshpande replied to Ramchandra Ambradkar's comment.

युनिकोड असल्यावर कोणते फाँट ?

Edit

Champra Deshpande replied to Sandeep Godbole's comment.

पीसी --

मराठीतला ' लोकमान्य ' हा चित्रपट बघा -- टिळकांचे सतत ओरडून बोलणे सहिष्णुतेने ऐकता येते का बघा --

सारखा कर्कशपणा कंटाळवाणा होतो --

पूर्ण रिलॅक्स्ड असणे म्हणजे स्वभावाचा अभाव !

शेवटी कुणी कुणाचे ऐकून थोडेच काही करणार आहे ? या निमित्ताने आपल्या सुमार , नाजुक आणि निर्बुद्ध अभिरुचीबाबत उपरोध व्यक्त करणे चाललेय हे -- इतिहासाचे मान्यताप्राप्त काम एकच -- स्फूर्तिदायक असणे -- त्याहून वेगळे काही कराल तर याद राखा -- असेच तर दिसते --

इथे नाही ना चालणार -- भावना दुखावल्या जातील --

त्या चित्रांचा उपयोग करायला माझ्याकडून खूप उशीर झाला, पण, ही सगळी प्रक्रिया होणे आवश्यक होते -- धन्यवाद प्रकाशजी ! ( प्रकाश बाळ जोशी ).

तीनदा आली होती ही पोस्ट असे दिसतेय -- कसे, कोण जाणे -- पण, आता राहू देतोय -- कारण कॉमेंट, शेयर वगैरे झालेय --

कोलटकर तर कविता लिहायचे -- एकटाकी लिहिले तरच प्रतिभावंत, असे काही नाही, एवढेच म्हणायचे आहे.

खानोलकरांचे ' एक शून्य बाजीराव ' हे मुळात, आता आहे त्याच्या दुप्पट मजकूराचे लिहिलेले होते !

अरुण कोलटकर कवितेत अधिकाधिक पूर्णता आणायचा प्रयत्न करत, असे माहितीत आहे. अर्नेस्ट हेमिंग्वेचे खालील वाक्य पाहावे --

“The first draft of anything is shit.”

— Ernest Hemingway

हे प्रतिभावंत नव्हते, असे कोण म्हणेल ?

या बाबतीत आदर्श असे काही नाही.

याचे कारण, बऱ्याचदा, वाचक हा कवितेला स्वतःच्या सवयीच्या ' अर्था 'त बसवू पाहतो, हे आहे. त्याने खुल्या मनाने कविता वाचायला हवी.

जरूर सांगाव्यात -- नंतर, ते सगळे काल्पनिक असते, तसे काही घडलेले नसते, तरीही आपल्याला गंमत वाटते -- हेही सांगावे. आणि मुख्य म्हणजे दुसरा एखादा माणूस तीच गोष्ट जरा फिरवून वेगळे तात्पर्य कसे काढू शकेल, तेही सांगावे.

' माझा तो सात्त्विक -- इतरांचा तो तामसी ' -- हा एक अर्थ सर्वांना मान्य होण्यासारखा आहे !

व्यक्तिगत नको वाटले -- आणि दुसऱ्या सर्व प्रकारच्या कलांना क्षुद्र लेखणारे माजोरी विद्रोही अनेकदा दिसतात -- कला म्हणजे फक्त क्रांतीचे हत्यारच असायला हवे, असे मानणारे --

सुरक्षितता हवीही असते पण निकडीच्या प्रश्नांसाठी सोडावीही लागते !

एका विद्रोही कवीचे इतर कवींना घाण शिव्या घालणारे वाक्य दिसले -- त्यामुळे, ही पोस्ट --

ते सगळे ठीक आहे -- फक्त विद्रोही कविताच श्रेष्ठ, असे कुणी म्हणू नये, एवढेच !

विद्रोही कवीला सगळे ज्ञान असते का ?

ज्ञानेश्वर, तुकाराम, शेक्सपियर हे जेवून लिहीत होते की भुकेने तडफडत लिहीत होते यावर काय अवलंबून आहे ? प्रत्येक कवितेखाली टीप द्यावी लागेल मग -- की बाबा ही जेवण झाल्यावर लिहिलीय कविता --

मौल्यवान कलेबाबतचे तुझे विचार पाहून आश्चर्य वाटतेय -- पण, तू ते बाळगणे ही तुझी इच्छा --

इथे देतो ते memories वगळता सगळा ताजा बहरच असतो ---

सर्वांनी उपाशी राहिले पाहिजे -- सर्वांनी फक्त विद्रोही कविताच लिहिल्या पाहिजेत -- नोकऱ्या, उद्योगधंदे करणे ही चैन आहे -- बेफिकिरी आहे -- सगळे बंद पाडले पाहिजे -- जेवणे याचा अर्थच अति खाऊन ढेरीवरून हात फिरवणे -- या असल्या वेडगळ कल्पना सोडा आता --

" मित्रा, तू वाईट परिस्थितीत आहेस हे मान्य, तुझा सात्त्विक संतापही मान्य -- पण -- सर्व प्रकारची चांगली कला ही मानवी मूल्यात्मकतेला पोषक असते, हे समजण्याची तुला अक्कल नाही -- नाही तो दबाव टाकायचा प्रयत्न सोड -- तो कुणाच्याच हिताचा नाही -- " -- हे एक साधे उत्तर त्याला देता येऊ शकते --

माझे म्हणाल तर विचारसरणी वा मते यांबद्दल मी फार टची नाही --

काव्यतत्त्व

अनुभव म्हणजे काय तर जगण्यातल्या घटितांना – घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच, अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर – प्रोग्रॅमिंगवर – कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. काही प्रतिक्रिया आदर्श ठरवून जास्तीत जास्त व्यक्तींच्या तशाच प्रतिक्रिया याव्यात असा प्रयत्न करण्याला ब्रेनवॉशिंग म्हणजे मनाला ठराविक पद्धतीने सवयबद्ध करणे म्हटले जाते. ते कोणत्याही प्रकारे चांगले, आरोग्यपूर्ण वा हितकारक मानले जात नाही. मुळात, अमुक प्रतिक्रिया आदर्श असे ठरवणेच अशक्य असते. ज्या त्या व्यक्तीला वा ज्या त्या व्यक्तिसमूहाला स्वतःच्या प्रतिक्रिया बरोबर, समर्थनीय, न्यायाच्या आणि हितकारक वाटत असतात. हे सर्व पाहता, कलेत, कोणताही अनुभव जसाच्या तसा प्रामाणिकपणे अभिव्यक्त करणे, हे फारसे मौल्यवान असू शकत नाही.

जगातले अनेक कवी, लेखक यावर बोलून गेलेले आहेत. अनुभवाची ही मर्यादा आणि एकमेकांच्या विरोधात असण्याची अवस्था ओलांडण्याचे महत्त्व ओळखणारे बरेच होऊन गेले आहेत. ज्ञानेश्वरांनी ‘ परतत्त्वाचा स्पर्श ‘ सांगितला, तुकाराम म्हणाला की ‘ बोलविता धनी वेगळाचि ‘ किंवा ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले ‘. असेच उद्गार फर्नांडो पेसोआ या विसाव्या शतकातल्या ‘ most profound ‘ ( अत्यंत सखोल ) समजल्या जाणाऱ्या कवीनेही काढलेले आहेत –

Rereading, I wonder: "Was that me?"
God knows, because he wrote it.

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो –
If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.

All this has nothing whatever to do with any will
of mine. ------- Pessoa.

साहित्यातल्या वा कलेतल्या कोणत्याच संकल्पनेची बिनचूक, समावेशक व्याख्या कधीच कुणाला करता आलेली नाही. त्याचे एक कारण, विविधतेला अंत नसतो हे एक आहे आणि दुसरे कारण, विदीर्णता ओलांडणारे भान हे एकात्म असते ( तुकारामाचेे ‘ एकविध मन ’ ), आणि बौद्धिक कृती ही फक्त तुटक, fragmented, विदीर्णतेचीच असू शकते – हे आहे. एकात्मतेचे अस्तित्व हे विदीर्णतेच्या भाषेत मांडून दाखवा, असे म्हणण्यात काहीच अर्थ नसतो. परंतु, बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा तसा हट्टाग्रह असतो. त्यामुळे त्यांच्याकडून, कलेतल्या मूल्याच्या प्रश्नाला भिडणारी सर्जक कलाकृती निर्माणही होऊ शकत नाही आणि तशा मौल्यवान कलाकृती त्यांना ‘ समजू ’ ही शकत नाहीत. ते त्यांच्या तर्क, बुद्धी यांच्या रटाळ, रद्दड आग्रहातच खुश राहू इच्छितात वा त्यातच डुंबत राहू इच्छितात. जगातले इतके मान्यताप्राप्त लेखक, कवी काय म्हणताहेत हे सगळेच ते हास्यास्पद ठरवून उडवून लावतात.

वर्डस्वर्थ ‘ recollected in tranquility ’ ( शांततेत स्मरण केलेले ) म्हणून गेला. शांतता म्हणजे विदीर्णतेचा गोंधळ असू शकतो का ? सार्त्रने नथिंगनेस ( रिकामेपणा ) सांगितला. तुकारामानेही ‘ रिकामीक ’ किंवा ‘ मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ’ हे आणि एकविध – एकात्म मन एकच असल्याचे सांगितले. पण, सार्त्रच्या नथिंगनेसपुढे गुडघे टेकणारे आपले विद्वान तुकारामाला मात्र ‘ अध्यात्मिक ’ म्हणून हसून सोडून देतात ! नथिंगनेस कळतो का बुद्धीने ? तो अध्यात्मिक नाही का ? काही शहाणे म्हणतात, सार्त्रच्या अस्तित्ववादाचा काळ आता संपला आहे – ती महायुद्धांना आलेली प्रतिक्रिया होती ! प्रतिक्रियेशिवाय काही कळतच नाही – ही अवस्था ! म्हणजे बुद्धाला ज्ञान झाले ते प्रेत, आजारी माणूस आणि वृद्ध यांच्यामुळे ! अरे वेड्या ती निमित्ते होती – ‘ त्यामुळे ’ असे नाही म्हणता येत ! इथे जर भावनिक कारणांनी शिव्या खाण्याची वा लाथा बसण्याची शक्यता नसती तर ज्ञानेश्वर-तुकारामांचाही काळ संपला, असे म्हणायला हे लाजले नसते ! सांगायचा मुद्दा हा आहे की विदीर्णतेच्या – बुद्धीच्या – मर्यादा एका व्यक्तीत ओलांडल्या जाणे म्हणजे ते त्या पूर्ण मानवजातीच्या ओलांडल्या जाणे असते – ती शक्यता कधीच संपत नाही. मौल्यवान लिहिणे म्हणजे लेखकाचा तो अमर होण्याचा वा ‘ कीर्तिरूपे उरण्याचा ’ प्रयत्न नसतो. प्रतिक्रियेच्या चक्रातून बाहेर पडण्याच्या मौल्यवान तत्त्वाचा तिथे स्पर्श असल्यामुळे ते लेखन सार्वकालिक आणि सर्व माणसांना प्रस्तुत होत असते.

प्रतिक्रियारूप जगणे आणि बुद्धीच्या एकरेषीय, तुकडेबाज मर्यादेत जगणे हेच अबाधित, अटळ आणि अंतिम असणार अशा निष्कर्षाने जगायचे म्हटले की धर्मातली वा घटनेतली सगळी आदर्श तत्त्वे ही फक्त शब्दरूपात उरतात आणि अर्थ म्हणून खलास होतात, हे डोळे उघडून पाहायला हवे. पेसोआ काय म्हणतो बघा –

“I believe in the World as in a daisy.
Because I see it. But I don’t think about it
Because thinking is not understanding…”
— Fernando Pessoa,

टी. एस. एलियट काय म्हणतो, ते पाहा –

Poetry is not a turning loose of emotion, but an escape from emotion; it is not the expression of personality, but an escape from personality.

आणखी एकदा पेसोआचे तेच उद्धृत –

If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.
All this has nothing whatever to do with any will
of mine. ------- Pessoa.

किंवा --

He knows there is no reason for anything to exist,
And he knows that to exist is to occupy a point.
What he doesn't know is that thought is not a point.
-- Pessoa

-- हे सगळे बुद्धीने कळणारे नाही. म्हणून फेटाळून लावायचे ?
सगळे बौद्धिकच असते असे समजून आपल्याकडे धरला जाणारा ‘ भूमिके ‘ चा, विशेषतः सामाजिक बांधिलकीचा आग्रह पाहता त्यावर गाओ झिंगझिआन काय म्हणतो, ते बघा –

What I want to say here is that literature can only be the voice of the individual and this has always been so. Once literature is contrived as the hymn of the nation, the flag of the race, the mouthpiece of a political party or the voice of a class or a group, it can be employed as a mighty and all-engulfing tool of propaganda. However, such literature loses what is inherent in literature, --- GAO.

यावर थोडक्यात म्हणजे एवढेच लिहिणे खूप झाले. मी जे ‘ काव्यतत्त्व ' म्हणतो ते इथे कसे मांडले आहे ते पाहा –

Poetic feeling does not derive simply from the expression of the emotions. Nevertheless, unbridled egotism, a form of infantilism, is difficult to avoid in the early stages of writing. Also, there are numerous levels of emotional expression and to reach higher levels requires cold detachment. Poetry is concealed in the distanced gaze. – GAO.

हा जो distanced gaze आहे ना, तेच काव्यतत्त्व ! अनेक मोठमोठ्या लेखक-कवींनी वेगवेगळ्या शब्दांत हे सांगितलेले आहे. यालाच मी अनेकदा ‘ समग्र भान ‘ तत्त्व म्हटलेले आहे. तसेच इथेही आहे --

Literature does not simply make a replica of reality but penetrates the surface layers and reaches deep into the inner workings of reality; it removes false illusions, looks down from great heights at ordinary happenings, and with a broad perspective reveals happenings in their entirety. – GAO.

म्हणूनच, माझ्या भाषेत न म्हणता बोदलेयरच्या भाषेत मी म्हणतो --

Always be a poet, even in prose. -- Charles Baudelaire
( नेहमीच कवी राहा – गद्यातही. )
--- ००० ---
मौल्यवान कलाकृती या कलावंताच्या सखोल चिंतनशीलतेतून येतात -- ती चिंतनशीलता म्हणजे आपमतलबी डावपेचांचे चिंतन वा स्वतःचे वर्चस्व स्थापन करण्याचे मनसुबे नव्हेत -- एवढे तरी आधी समजून घ्यायला हवे --

ते सगळे लक्षात घेऊनच आपण बोलतोय -- ते निसरडे असणार असे बुद्धी म्हणतेय म्हणून आहे तो नायनाट चालू ठेवू या -- यात काय अर्थ आहे ? ' अध्यात्म ' या शब्दाची इथे खूप जणांना ॲलर्जी आहे -- तो शब्द वगळून बोलता येते का तेही पाहायला हवे -- नुसतेच टाळाटाळीचे बोलून काय उपयोग ?

यावरची माझी कॉमेंट ( बहुतेक मोठी असल्याने ) इथे स्वीकारली गेली नाही. यावर उपाय म्हणून ती स्वतंत्र पोस्ट रूपात दिली आहे -- ती कृपया पाहावी --

चला, या सेमिनारमध्ये भाग घ्यायला फारसे कुणी उत्सुक नाहीत असे समजून आता मी स्वतःच यात भाग घेतो आणि मला ही कविता कशी समजते, ते सांगतो. माझे आकलन विद्याधर मालेगावकरांबरोबर जाणारे आहे. ही एक अभिसारिका तिच्या प्रियकराकडे चाललेली आहे, हे पहिल्याच कडव्यात स्पष्ट होते. तिच्या ' निघण्याची ' सुरुवातच महाउत्तुंग होते ! जळात केशर टाकून खुद्द सूर्य यांना भेटवण्यसाठी झुलता पूल तयार करतो ! ही सूर्यास्ताची वेळ आहे. केशरी, कोवळ्या उन्हांचा हा जबरदस्त उत्सव आहे. पुढच्या कडव्यात तर आख्खे विश्वच या दोघांच्या मीलनाला अनुकूल होताना दिसते. संध्याकाळ संपता संपता केसांत विजेची फुले येतात. मग रात्र होते. ती तिला चंद्रकळा नेसवते. काळी साडी. आणि खुद्द चंद्र तिच्या डोळ्यांत काळे काजळ घालतो. सूर्यच जणू आज्ञा देऊन गेलाय सर्वांना ! आणि पहाटे -- आता मात्र अगदी सगळे पूर्ण झालेय -- हे ओळखून चतुर उषासखी मेणा घेऊन येते ! -- आणि इथे आपणही थबकतो आणि कविताही संपते. म्हणजे, पूर्ण रात्र अशीच नुसती तयारीतच संपूनही गेली -- ही अजून इथेच आहे -- आणि अरेरे, दिवस सुरू होतोय ! म्हणजे ही भेट तरी रद्दच होणार ! मग, हे इतके काय चालले होते ? नुसतेच स्वप्नरंजन ? त्या स्वप्नरंजनातल्या उत्तुंग आनंदाबरोबरच आता विरहाच्या दुःखाचा आणि निराशेचा प्रचंड लोंढा उसळून येतो ! बाप रे ! म्हणजे, सारख्याच तीव्रतेचे सुख आणि दुःख एकत्र ! जगण्यातली अजब, अपवदात्मक शक्यता इंदिराबाईंनी अत्युत्कटतेने व्यक्त केलीय ! असा अजब कारनामा कवितेत क्वचितच घडतो !
या कवयित्रीला सलाम करण्याच्याही पलिकडे जाते सगळे !

इंदिराबाईंचे पती सुमारे दहा वर्षांच्या त्यांच्या संसारानंतर वारले होते. त्यामुळे सतत एक विरहभावना त्यांच्या सोबत, त्यांच्या कवितेत असे. ही त्यांची व्यक्तिगत माहिती नसली तरीही ही कविता पूर्णपणे पोचू शकते, असे मला वाटते.

एवढ्या लहानशा कवितेत इतकी प्रचंड अर्थसमृद्धी ! माझ्यासारख्या एखाद्या वाचकाला याही पलिकडचे एक सत्य यातून जाणवू शकते -- सुख-दुःख दोन्ही निरर्थक असणे !

मराठीतली एक अपवादात्मक विशेष कविता !

--- ००० ---

कवीचे शहाणपण, पक्कता ही तीच असते -- अनेक कलाकृतींतूनही --

होय -- आशय हा अनुभव-निरपेक्ष असतो -- तो अनुभवाच्या निमित्ताने व्यक्त होतो --

कलातत्त्व हे अभिव्यक्तीतील कौशल्य, सफाई, सूक्ष्मता पकडण्याची कुवत -- असे मला दिसते -- काव्यतत्त्व हा मूळ आशय --

बिनचूक व्याख्या करण्या ऐवजी कलेच्या एका सर्वात महत्त्वाच्या गुणाबद्दल बोलणे आहे -- व्याख्या म्हणून सदोष आहे, हे मान्य.

मी त्याला सर्व कलेतले काव्यतत्त्व म्हणेन.

काव्यतत्त्व एकच !

लिहीत राहावे -- आपले आपल्याला काही महत्त्वाचे सापडत जाते --

आपली समरूपता श्रेष्ठ असा भ्रम बाळगणे हाच तर प्रॉब्लेम असतो !

कुणाचीही कोणतीही समरूपता संकुचित आणि फालतूच असते !

चेतन तर गेला ! उरलेल्या आपल्या तिघांच्या मैत्रीला भरपूर शुभेच्छा !

ही पोस्ट चुकून दोनदा आली होती -- एडिट केलेली ठेवून दुसरी डिलीट केलीय --

तुम्ही इथे द्याल ते सर्वांनी वाचलेच पाहिजे, हा कायदा रद्द करा, म्हणजे झाले !

चा चा चा या नावाचा एक डान्स प्रकार असून त्या नावाचा एक सिनेमाही होता --

फारच वाईट ! उघड्या मॅनहोलमध्ये ते पडले होते म्हणे --

त्यातून खरी कळणारी बातमी हीच की सगळे पुढारी तत्त्वहीन आहेत, हे सर्वांना पटलेले आहे -- त्यामुळे, कुछ भी हो सकता है , असे वाटते !

भावनिक अवलंबित्व आले की हिंसा अटळ -- या दृष्टीने पाहावे --

Champra Deshpande commented on Mohit Takalkar's photo.

कवितेला सर्वस्वाने सामोरे जाणे !

कविता ही पूर्णपणे मानवी स्तरावर -- ' जे आहे ते ' पाहणारी असणे मला महत्त्वाचे वाटते --

उत्तराधुनिक ‘वि’  चित्राख्यान (मंगेश नारायणराव काळे)
esakal.com
अत्युत्तम आहे हा लेख !

राम दौंड हा एक उत्तम नट आहे हे मी जाणून आहेच -- हे परीक्षण वाचल्यावर त्याच्या या एकूण कामाबद्दल खूपच उत्सुकता निर्माण झालेली आहे --

' चांगले काय ते मला समजते -- मी निर्दोष आहे -- आणि वाईट ते सगळे अमुकतमुकमुळे घडते आहे ' एवढाच सारांश असतो बऱ्याचदा --

August 25
Champra Deshpande commented on Mohit Takalkar's video.

' ढोलताशे ' कानडीत -- बंगळुरू ' ला -- १ व २ सप्टेंबरला !

बधीर करते ते चांगले म्यूझिक !

Postmodernism – Right and Wrong?

Postmodernists do not attempt to refine their thoughts about what is right or wrong, true or false, good or evil. They believe that there isn't such a thing as absolute truth. A postmodernist views the world outside of themselves as being in error, that is, other people's truth becomes indistinguishable from error. Therefore, no one has the authority to define truth or impose upon others his idea of moral right and wrong.

प्रेमाने असो की अढीने, देवाची आठवण ठेवली की पुण्य मिळणारच !

त्याला मारणाऱ्या हीरोने एकदा त्याच्या टकलावर काडी घासून पेटवून सिगरेट शिलगावली होती !

Champra Deshpande commented on Ranjit Mohite's video.

Ranjit and Champra are celebrating 3 years of friendship on Facebook!
अरे वा ! माझ्या एका नाटकाचा हीरो !

चिंतनशील आवाजाची साधी, सुंदर, विद्वान गायिका ! खूप शुभेच्छा, प्राची !
( प्राची दुबळे ).

Champra Deshpande commented on Saleel Wagh's post.

कविता ही मानवाची आदिम प्रेरणा आहे. माणूस कवी झाल्याक्षणी तो 'माणूस' होतो. सच्ची आणि अस्सल कविता आपल्या भाषेच्या माध्यमातून सतत आदितत्त्वाचा वेध घेते आणि सनातन सूत्राला उसकावून अंगावर घेते -- अगदी मान्य !

लिव्ह इन हे जर बेकायदेशीर नसेल तर तो दहशतवाद कसा -- मलाही प्रश्न पडलाय --

चिमण्या गेल्या तसे बेडूकही गेले ?

मुळात धरलेलेच नसताना ती ' सोड ' का म्हणतेय ?

मतला meaning in hindi
[सं-पु.] - ग़ज़ल का पहला शेर।
-- याचा अर्थ मुखडा वा ध्रुवपद.

आणि मक्ता म्हणजे शेवटचा शेर.

Champra Deshpande commented on his own post.

Ghazal, is a set of two liner couplets, which strictly should end with the same rhyme and should be within one of the predefined meters of Ghazals. There has to be minimum of five couplets to form a Ghazal. Couplets may or may not have same thought. It is one of the most difficult forms of poetry as there are many strict parameters that one needs to abide by while writing Ghazal. It is important to think about the topic as well as the theme of a Ghazal before starting to write it. The first line of a Ghazal must include a Refrain, which is a word or a phrase that can be easily fitted into the other couplets. Each couplet of a Ghazal is known as Sher, which forms a Shayari. Thus, it means that different Shayaris together form a Ghazal.[3]

Form.

A traditional Ghazal consists of five to fifteen couplets, typically seven.
A refrain (a repeated word or phrase) appears at the end of both lines of the first couplet and at the end of the second line in each succeeding couplet.
One or more words before the refrain are rhymes or partial rhymes.
The lines should be of approximately the same length and meter.

The poet may use the final couplet as a signature couplet, using his or her name in first, second or third person, and giving a more direct declaration of thought or feeling to the reader.

Style.

Each couplet should be a poem in itself, like a pearl in a necklace.
There should not be continuous development of a subject from one couplet to the next through the poem.
The refrain provides a link among the couplets, but they should be detachable, quotable, grammatical units.
There should be an epigrammatic terseness, yet each couplet should be lyric and evocative.

सर्व प्रतिमा वस्तुरूपच --

सर्व संबंध हे प्रतिमासंबंध असणे --

संज्ञाप्रवाही कादंबरी असेल तर ती बहिर्भाषा की अंतर्भाषा ?

कविता म्हणजे कवीचे सुखदुःख वा मानसिक गोंधळ -- ही कवितेची फारच अपुरी कल्पना आहे.

मागासलेपण असेल, योग्य प्रतिनिधित्व नसेल तर न्यायासाठी आरक्षण जरूर असावे -- त्याचे निकष, प्रमाण यांचा अभ्यास प्रत्येक नागरीक नाही करू शकणार.

विचार थांबणे हे आदर्श समजावे का ?

Champra Deshpande commented on Hemant Adarkar's photo.

'चंप्र सर, सत्यकथा ऑगस्ट १९७२ @[100000669434144:2048:Champra Deshpande]'
अरे वा ! हे कसे काय सापडले मधेच ?

अविश्वासापेक्षा, हे कसे शक्य होऊ शकते हे कळले तर इतरांचाही फायदा होईल, हा हेतू ! ही सकारात्मक बाजू जमल्यास बघा --

मनमोहन देसाईंचे एक वाक्य माझ्या डोक्यात कोरले गेलेय -- " प्रेक्षकांना फसवायचे नाही -- त्यांना जे हवे आहे तेच नेमके द्यायचे ! " ( फसवायचे नाही -- हे ज्याला कळते -- तोच घोर फसवणूक करू शकतो ! )

' तिसरी कसम ' उत्तम ! त्यातल्या लाली लाली डोलियामे या गाण्यातले वहिदाचे हास्य ! ग्रेट !

शिवाय त्याची गाणी तो अनुनासिक मुकेश म्हणतो ! नाही आवडत --

राज कपूर मला नाही आवडत -- तो फारच बोध देत बसतो -- मनोजकुमारचा भाऊच जणू --

हल्लीचा तो तमाशावला रणवीर कपूर आणि नवाजुद्दिन सिद्दिकी --

देवानंद, गुरुदत्त, शम्मी कपूर आणि राजकुमार आणि अर्थात नसिरुद्दिन !

शाळेत असल्यापासून माझे हे चालू आहे -- तेव्हा तर एक ' ब्लॅक कॅट ' नामक पिक्चर मी पाहिला होता तर सापडेल त्याला त्याची स्टोरी सांगून मी हैराण करायचो !

नाट्य डोक्यात भिनवत राहायचेच --

अग्निपथ !

असल्या गोष्टींत मी बाहुबली !

चपखल आठवलेय की नाही ?

या पुस्तकाची अनुक्रमणिका जानेवरी २०१६ मध्ये चर्चा करून ठरवली. फेब्रुवारी २०१६ पासून १९ ऑगस्ट २०१६ पर्यंत हे ७०० पानी पुस्तक लिहून पूर्ण केले -- असे नीलांबरी जोशी म्हणताहेत.

मग, मला तर हजारोंची कत्तल करावी लागेल ! कवितेत इंटरेस्ट असणारे कमीच असणार --

असे होते कधी कधी -- सक्तीने काहीच करू नका --

Champra Deshpande commented on Mallika Singh's photo.

Renovation Tickets & Online Booking - BookMyShow
in.bookmyshow.com
Details
Based on a play in MARATHI
'PREMACH MAHNU YALA HAVA TAR' written by Shri Chandrakant Prabhakar Deshpande (aka Champra Deshpande)
Translated in HINDI & Directed by Gagan Dev Riar and Mahesh Keskar

PLAY ON'S 'RENOVATION' premiered at the PRITHVI FRINGE FESTIVAL 2016

Synopsis:
Post their marriage Anurag and Antara are found discovering the true meaning of their relationship. Along with all the other household items in need of repair, their love too needs some FIXING!
A peep into one of their 'regular' days now, what is the truth of their relationship?
Survival? Settlement?
Or is this what they call LOVE?

Duration: 55 minutes –No Interval

Languages: HINDI and ENGLISH

Performed by Manjiri Pupala and Gagan Dev Riar

TICKETS avaiable at the Venue and on

BookMyShow - https://in.bookmyshow.com/plays/renovation/ET00060516

अत्यंत बुद्धिमान रंगकर्मी ! माझे ' नाणेफेक ' हे नाटक त्यानेच दुबेजींना वाचून दाखवले होते. पुढे ते दुबेजींनी दिग्दर्शित केले.

नंदिनी आत्मसिद्ध यांना मनःपूर्वक धन्यवाद ! त्यांचा वरील लेख त्यांनी वाचायला पाठवला होता -- तो फारच अभ्यासपूर्ण आणि सविस्तर लेख आहे -- आपल्या फ्रेंडसनी तो वाचणे महत्त्वाचे वाटल्याने मी त्यांना तो लेख इथे देण्याची विनंती केली. आपण सर्वांनी जरूर वाचावा असा लेख आहे ! ( मंटो वरचा लेख ).

छानच ! सूक्ष्म आणि सुंदर लेख !

ओ हेन्री जसा शॉक योजतो तसे मंटो कधीच करत नाही --

तेंडुलकर, गो पु देशपांडे, पु ल देशपांडे, सतीश आळेकर -- यांच्यावर डॉक्युमेंटरीज आहेत --

तुझी सगळी मते बाजूला ठेवून एकदा तुकाराम वाच -- आधी मते आणि मग समजून घेणे, असे होऊ शकणार नाही --

माहीत नसलेल्या आणि ज्यात इंटरेस्ट नाही अशाही गोष्टींबाबत आपली मते ठरलेली असली तर प्रश्नच मिटतो !

गल्तिसे मिस्टेक -- हे गाणे ऐकावे --

नक्कीच भेटू, बोलू -- खूप दिवसांनी झाला आपला संवाद ! छान वाटले ! शुभेच्छा ! ( शशिकांत बऱ्हाणपूरकर ).

डी एन ए वा मेंदूप्रत्यारोपण अशा विषयांत मी शून्य आहे -- नथिंग --

मी सगळ्या विषयांतला विद्वान वगैरे नाहीय -- आणि खूप अंगांनी ' ज्ञान ' जमा केले म्हणजे ते नथिंगनेसला पोचेल, असे नाही --

व्यक्तिगत दृष्टिकोण तयार होण्याचा हा प्रश्नच नाहीय -- ते असतातच प्रत्येकाचे काही ना काही -- त्यांना नथिंगनेस नाही म्हणता येणार --

अरे भाऊ, ती बौद्धिक अवस्था वा प्रगतीचा टप्पा नाही -- आपण सगळे त्यातच बसवू पाहतो -- यालाच मी चेष्टेचा सूर म्हणतो -- बरेच लोक या गोष्टी गांभीर्याने समजून घ्यायचा प्रयत्नही करतात -- तसे नसते तर बेकेट, आयनेस्को, पिरांदेल्लो हे कधीच कचऱ्यात टाकले गेले असते --

आपले सर्व अनुभवणे भूतकाळाधारित असते -- तसे नसलेले अनुभवणे -- हे बुद्धिप्रामाण्यवादात नाही बसणार -- आपल्याला ते बौद्धिक करून हवे असते -- absurdity अनुभवणे हेही बुद्धिप्रमाण्यवादी नाही असू शकत -- nothingness ही बौद्धिक नसतो --

आशय टाळला जाणे --

बौद्धिक असते का ? म्हणजे बौद्धिक प्रगतीचा एक टप्पा ? जास्त बुद्धिमानालाच कळेल, साध्या माणसाला कळणार नाही -- असे काही ?

मागे पुढे अवघा दिसे रिता ठाव ।

' निर्वाण ' बौद्धिक असते का ?

म्हणजे, सार्त्र आणि तुकाराम ?

आणि ज्ञानेश्वर, तुकाराम मी वाचलेत, पण, भागवत नाही वाचलेले -- तीच उणीव असावी -- आणि जगण्यातल्या ॲब्सर्डिटीचा तुम्हाला म्हणजे मला थोडा अंदाज जरी आला ना तरी किरकोळ प्रश्न आणि महत्त्वाचे प्रश्न असा भेद राहात नाही --

मन याचा अर्थच द्वंद्व -- हे मनाचे खेळ आहेत --

Rajan Khan's photo.
लौकर बरे व्हा -- डॉक्टरी सल्ल्याने राहणे आणि शांत, मजेत राहणे !
शुभेच्छा !

मनाचा जणू दगड होत जाणे --

July 27
Champra Deshpande commented on Priya Jamkar's post.

तुझ्या जन्माचे सार्थक म्हणावे, अशी भूमिका ! प्रयोगाला शुभेच्छा !

डॉ. पुंडलिक, डॉ. व्ही. बी. इनामदार, प्रा. गो. म. कुलकर्णी आणि माझे वडील -- ही कुटुंबे एका काळात विजापूरला होती. तिथल्या आजरेकर चाळीत आम्ही राहात असू. त्याच काळात प्रा. श्री. र. भिडेही तिथे होते -- आम्ही तिथे ४६ ते ५६ होतो -- डॉ. पुंडलिक यांतली नेमकी किती, कोणती वर्षे तिथे होते, ते नाही सांगता येणार --

माझे पहिले पुस्तक -- पहिला एकांकिकासंग्रह, ' इतिहास आणि इतर एकांकिका ' हा डॉ. पुंडलिकांमुळे निघाला -- प्रकाशक होते ' सुपर्ण प्रकाशन '. डॉ. पुंडलिक विजापूरला प्राध्यापक होते तेव्हा त्याच गावात माझे वडील शिक्षक होते. पुंडलिक पतिपत्नींनी मला बालपणापसून पाहिलेले होते. त्यांचे विशेष प्रेम मला लाभलेले होते.

मी काही श्रद्धाळू वगैरे नाही, पण, हे गाणे ठीकच आहे -- ७० सालचा ' गोपी ' -- ( कवी राजेंद्र कृष्ण )

रामचंद्र कह गए सियासे ऐसा कलजुग आएगा
भैया, आज तो हम तुम्हे एक नए जमानेकी कथा सुनायेगे
अरे बाबा किसीभी जमानेकी सुनाओ पर सुनाओ ज़रूर
सियावर रामचंद्रकी जाया

हे रामचंद्र कह गए सियासे ऐसा कलजुग आएगा

हंसा चुगेगा दाना दुनका कौव्वा मोती खायेगा

सियाने पूछा,
कलजुगमे धरम करमको कोई नही मानेगा?
तो प्रभु बोले

धरम भी होगा, करम भी होगा
परन्तु शर्म नही होगी
बात बात पर माता पिताको
लड़का आंख दिखाएगा
राजा और प्रजा दोनो इनमे
होगी निसदिन खीचातानी
कदम कदम पर करेगे
दोनो अपनी अपनी मन मानी
जिसके हाथ मे होगी लाठी
भैंसा वाही ले जाएगा
सुनो सिया कलजुगमे काला धन और काले मन होगे
चोर उचक्के नगर सेठ और प्रभु भक्त निर्धन होगे
जो होगा लोभी और भोगी वो जोगी कहलायेगा
मंदिर सूना सूना होगा भरी रहेगी मधुशाला
पिताके संग संग भरी सभामे नाचेगी घरकी बाला
कैसा कन्यादान बिदाही कन्याका धन खायेगा

मूरख की प्रीत बुरी जेकी जीता बुरी
बुरे संग बैठा बैठा भागे ही भागे
काजल की कोठारी मे कैसे ही जाताना करो
काजल का दाग भाई लागे ही लागे
कितना जाती हो कोई कितना सटी हो कोई
कामनी के संग काम जागे ही जागे

सुनो कहे गोपीराम जिसका है रामधामा
उसका तो फन्दा गले लागे ही लागे

-- या गाण्यात मतभेदाचे मुद्दे आहेतच -- वाचा आणि द्या सोडून --

Champra Deshpande commented on Kaushal S Inamdar's post.

छत्री न खोल -- उड जायेगी ! -- हाच तुला मोलाचा सल्ला !

या दोघांच्या तत्त्वशील सहकार्याने पाच वर्षे नीट पार पडतील, असा आता जनतेलाही विश्वास वाटू लागलेला आहे !

' सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख ' या विभागातले लोक स्वतःच्या जगण्यात आळशी असतात -- इतिहास हेच त्यांचे जीवन असते !

निकाल द्यायचे सोडून, विनोद बघा, ही नम्र विनंती -- इथे मी शाब्दिक व्यंगचित्रे देत असतो, हे अनेकदा सांगितलेले आहे -- आणि कोणत्याही पक्षाला मी बांधील नाही -- शिवाय आता, भूमिका या विषयावरही बोलू -- महाराष्ट्रातला राष्ट्रवादी काँग्रेस हा एक महत्त्वाचा पक्ष आहे जो स्वतःला काँग्रेसी परंपरेतला धर्मनिरपेक्षतावादी पक्ष म्हणवतो आणि भाजपाला जातीय, धर्मवादी म्हणून हेटाळतो -- तर तो राष्ट्रवादी कधीही भाजपाशी घरोबा करायला आतुर आहे, हे दिसत असल्यावर इथे भूमिकेच्या गप्पांना कितपत अर्थ उरतो ? एरवीही तत्त्वे, भूमिका सगळेच मातीत घालत असतात -- त्याबाबत आपण फार टची न राहणेच बरे !

मुळात हे न टाकलेल्या बॉलवरचे चाललेय --

म्हणजे काय --
१. ठराविक वयानंतर समाधी घ्यायची ? की हसत आत्महत्या करायची ?
२. मेंदूचे कार्य इंजेक्षन देऊन बदलायचे किंवा बंद पाडायचे ?

माहिती तपासून घ्या --

**तुम जिओ** हजारो साल सालके दिन हो पचास हजार !

बऱ्याच वर्षांपूर्वी विनय हर्डीकरांनी साहित्य संमेलनाबाबत एक लेख लिहिला होता -- त्याचे होते हे शीर्षक -- ' सुमारांची सद्दी ' !

त्या खिल्लीची लिंक देता आली तर दे इथे --

जरूर लिही --

आधी तोच वाचला -- या आधीची पोस्ट त्यावरच आहे --

ढिंचाक पूजाचे आणखी एक गाणे ऐकले –

दिलोंका शूटर है मेरा स्कूटर
दिलोंका शूटर
कोई नही है मुझसे क्यूटर
दिलोंका शूटर

जो आहे त्या आवजात गाणार ! रियाझ, तपस्या, अभ्यास, वगैरे घाला सुरळीत ! या ढिंचाकची अत्यंत वाईट भाषेत टिंगलटवाळी किंबहुना तिला शिव्यागाळीही झालेली आहे. तिला त्याचे काही घेणे नाही. तुम्ही आम्हाला हे असले गलिच्छ जग दिलेत, वगैरे, मागच्या पिढीला बोल लावत बसण्यातही इंटरेस्ट नाहीय, वेळही नाहीय ! सगळी अनिश्चितता, घाण आणि हिंसा यांच्या या जगात आम्ही शोक करण्यात वेळ घालवणार नाही. आहे ते शरीर, आहे तो आवाज, सुचेल तसे गाणे यांनी आम्ही साजरे करत राहू आमचे जगणे ! आम्हाला हे सत्य कळलेय की फक्त हा एकच क्षण आहे जगायला – भोसड्यात गेली संस्कृती आणि अभिजातता आणि तर्क आणि मानवी मूल्येबिल्ये ! आम्ही जगाला लाथा घालून मजेत राहणार – जगाने हवे तर आम्हाला लाथा घालाव्यात ! तुम्हाला सुचतील, माहीत असतील तेवढ्या सगळ्या घाण शिव्या आम्हाला द्या ! बास ? झाले ?

आता ऐका – सेल्फी मैने ले लिया –
अब एंजॉय करो – और हँसो भी, यार --

अत्यंत भेदक असा सांस्कृतिक पंचनामा !

उदगीरकरांचा उदबोधक आणि विचारप्रवर्तक लेख ! खरे तर या पूर्ण लेखावर नीट चर्चा व्हायला हवी –

( ढिंचाक पूजावरचा लेख )

'अशाप्रकारे पोटाचा प्रश्न सुटलेला आहे !!!!'

मोठ्या प्रश्नावर छोटा उपाय !

बाबू राजेंद्र प्रसाद (1884-1963)

पेशे से वकील राजेंद्र प्रसाद आजादी के संघर्ष में कांग्रेस के प्रमुख नेताओं में शुमार रहे. उन्होंने महात्मा गांधी की प्रेरणा से वकालत छोड़कर स्वतंत्रता संग्राम में उतरने का फैसला किया. बिहार में सीवान के जीरादेई गांव में जन्मे बाबू राजेंद्र प्रसाद ने 1911 में कांग्रेस को ज्वाइन किया. उसके बाद वह बिहार और ओडिशा प्रांत के नेता बने. वह संविधान का निर्माण करने वाली संविधान सभा के अध्यक्ष रहे. उससे पहले 1946 में अंतरिम राष्ट्रीय सरकार में पहले खाद्य एवं कृषि मंत्री रहे. वह 1950 में संविधान सभा की अंतिम बैठक में राष्ट्रपति चुने गए और 26 जनवरी, 1950 से 13 मई, 1962 तक देश के राष्ट्रपति रहे.

परफेक्ट ! बाबू राजेंद्र प्रसाद !

योग्य उत्तर देईलच कुणीतरी -- अन्यथा, मैं हूँ ना !

Datta and Champra are celebrating 6 years of friendship on Facebook!

वा ! आपल्या या मैत्रीला भरपूर शुभेच्छा ! तुमच्या लेखणीतून आणखी नाटके येत राहोत, ही एक विशेष शुभेच्छा !

July 19

तुकाराम म्हणतो, ' एकविध मन ' म्हणजे विदीर्ण नसलेले -- एकात्म मन, म्हणजे देव --

आस्तिकतेचा महत्त्वाचा, अर्थपूर्ण काही प्रकार असतो का, त्यावर बोल --

खुळचट काय आहे ते बोलायला आयुष्य अपुरे पडेल -- तसे नसलेले काय आहे, ते बोल --

म्हणजे जगत्ता जगताच मन समजत गेले होते !

हमे सब मालूम है जन्नत की हकीकत
दूसरोंको बहलाने के लिये हम पूछते रहते हैं !

अरे बाबा, आपण लेखक-कवी आहोत -- शिवाय संवेदनशील !

छे छे -- आपल्या जगण्याच्या ओघात घडलेले एक काम --

July 16
Champra Deshpande commented on Mukesh Machkar's post.
पिरांदेल्लो चे ' हेन्री द फ़ोर्थ ' हे नाटक -- सेम ! त्यावरून मराठीत ' मीच एक शहाणा ' हे नाटक आले होते !
Champra Deshpande commented on Mukesh Machkar's post.
महाग्रेट पोस्ट !

वा ! ग्रेट !
या निमित्ताने माझी एक आठवण सांगतो. मी एका खेड्यात आमच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एका शाखेत शाखाप्रबंधक म्हणून काम करत होतो. तिथे न्हावी घरोघर जात पण सलून नव्हते. ते न्हावी मागासवर्गीयांची दाढी-कटिंग करत नसत. ते आपापले जमवून घेत. बँकेने दिलेल्या माझ्या अधिकारांत माझी जाहीर ऑफर होती की कुणाही न्हाव्याने आज सांगावे आणि उद्या दुकानासाठी कर्ज घेऊन जावे ! खूप महिने याला प्रतिसाद नव्हता. तरी, मी त्या ऑफरचा पुनरुच्चार करत राहिलो. शेवटी झाला एकजण तयार ! दुकान सुरू झाले ! दुकानात, अर्थातच, सर्वांना मुक्त प्रवेश होता !

' वाईट आहे ते इतरांमुळे -- माझ्यामुळे नव्हे -- '

' चल, काहीतरीच काय ! ' हेही चालेल !

तो प्रकाश टाकणेच चाललेय -- सगळी चर्चा वाचा --

त्याहून जास्त काय असते उत्तम नटाकडे, ते बोलतोय.

-- तुला जनरल वाक्यच हवे असेल तर मी म्हणेन की बहुतेक नट वैचारिक आहेत -- चिंतनशील नाहीत. आणि दुसरे म्हणजे तत्त्वज्ञ हा लमाण असू शकत नाही. नुसता भारवाही तत्त्वज्ञ कामाचा नाही. आणि हेही स्पष्ट करतो -- विचार हा एकरेषीय असतो -- मर्यादित असतो -- चिंतन हे समावेशक आवाका घेणारे असते.

त्याच्या एरवीच्या जगण्यातही असणारी नाटकनिरपेक्ष चिंतनशीलता नटाच्या अभिनयातही दिसते, असे म्हणायचे आहे.

मला तुलनेत इंटरेस्ट नसून, नट हा ' लमाण ' नसतो, हे सांगण्यात इंटरेस्ट आहे. तो शब्द सरळच, लेखकाने दिलेले सामान प्रेक्षकाकडे पोचवणे, या अर्थाचा आहे.

अनुभवाची समज म्हणजे काय आणि ती अनुभवाचा भाग असते का -- यावर विचार कर -- माझ्या मते वरील तिन्ही वाक्ये बाद आहेत --

मुळात हा विषय मी पोलिटिकल समजत नाही, तरीही, तुमचे म्हणणे जरा स्पष्ट करा --

सर्जकता म्हणजे नुसते कौशल्य वा हमाली नव्हे --

' करप्शनविषयी थोडेसे ' हा माझा ' अभिरुची ' त आलेला लेख माधवरावांना खूप आवडला होता -- त्यानंतर त्यांनी एकदा मला त्यांच्या घरी जेवण-गप्पा यांसाठी बोलावले होते -- पार्ल्यालाच ! ( माधव वाटवे ).

मी एक नवखा कॉलेज विद्यार्थी होतो तेव्हा माझी एक एकांकिका वाचून माधवराव मला म्हणाले होते की तू साहित्य संघात ये, मी तुला त्यातला काही भाग करून दाखवतो -- म्हणजे तुला कळेल की ते स्टेजवर कसे होते --

तुम्ही त्यांचे ' एक शून्य बाजीराव ' पाहिले होते का ?

माझ्या वेबसाईटवर सगळे आहे --

मी निळूभाउंची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती -- ती माझ्या वेबसाईटवर आहे --

www.champralekhan.com

July 12

July 11

Champra Deshpande commented on Ashutosh Potdar's post.

वा ! तुम्ही कविता लिहिता, हे माहीत नव्हते --

-- माझ्या अनेक नाटकांवर त्यांनी ' सामना ' मधून दिलखुलास परीक्षणे लिहिली !

त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन ! ( मंगेश तेंडुलकर ).

त्यांच्या समृतीस सादर प्रणाम !

डाव्यांचे काही म्हणणेच राहिलेले नाही, असा काळ आल्याने, आता, डावे आणि उजवे यांतला भेदच नष्ट झाला असावा ! ( की काय ? )

टीकाकाराला वा समीक्षकाला त्याच्या मूल्यमापन-प्रक्रियेसह बोलता यायला हवे -- अन्यथा त्याचे बोलणे हे फक्त मते वा शेरे या स्तरावर राहते. त्यातही आशयकेंद्री बोलू शकणारे फारच विरळा !

माझ्या अनेक नाटकांवर त्यांनी ' सामना ' तून परीक्षणे लिहिली होती, ते आठवले ! त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन !

डावे आणि उजवे यांत आज नेमका भेद काय, कसा आहे ?

तुम्ही कशाचाही गौरव करायचा ठरवलात की मानवी संबंधांचे रिच नाट्य मागे पडणारच -- ' उध्वस्त धर्मशाळा ' मध्ये काल्पनिक पात्रे असूनही तिथेही नायक-गौरव आहे --

छुप्या व्यभिचाराचे प्रमाण पुरुष ४० टक्के आणि स्त्रिया २० टक्के म्हणतात -- भारतात समजा निम्मे असेल --

हा नुसता लिव्ह इन चा विषय नाहीय --

३० टक्के सत्य व ७० टक्के कल्पना -- असा हा चित्रपट असल्याचे भांडारकर सांगताहेत --

उदाहरण म्हणून हे घ्या -- समाजवादी आणि कम्युनिस्ट यांनी महाराष्ट्राचे अपरिमित असे सांस्कृतिक नुकसान केलेले आहे आणि करतही आहेत ! कारण, राजकारणात शून्य असले तरी सांस्कृतिक सत्तास्थाने हे लोक बाळगून आहेत !

हे म्हणजे -- " तो कसला मला भितो -- मीच त्याला भितो ! " -- असे झाले !

काही वेळी, विशेषतः लिफ्ट दुरुस्तीसाठी, जास्त खर्च येत असेल तर जास्तीची कॉंट्रिब्यूशन काढायचे ठरते -- तेही सर्व सभासदांना बंधनकारक असते --

सोसायटीचे पदाधिकारीही बाय-लॉज वाचत नाहीत आणि त्यांचा उपयोग करत नाहीत -- त्यामुळे खूप अनावश्यक प्रश्न निर्माण होत राहतात --

सर्व कॉमन सेवांचे समान पैसे देणे सर्व सभासदांना कायद्याने बंधनकारक असते.

असे करण्याऐवजी सोसायटीने त्यांना वसूलीची नोटीस पाठवावी -- त्यांच्या गुंडगिरीचा त्रास इतर सभासदांना होऊ नये --

थोडक्यात, कलेच्या क्षेत्रात चांगले, मूल्यात्मक वगैरे काही नसते -- फक्त निरनिराळी मते असतात ! ती ठामपणे मांडली की झाले ! हे भूमिकावाले उगीचच भूमिकेची कला श्रेष्ठ म्हणत बसतात आणि इतरांना कलावादी म्हणून हेटाळत बसतात ! खरे तर भूमिकावाद्यांनीही वरील सर्व सिनेमा-नाटकांचे स्वागत करायला हवे ! आता मतच मांडायचे तर माझे एक मांडतो -- आपल्याला जे कळत-समजत नाही त्याची टिंगल वा हेटाळणी करा, ही पद्धत मराठीत, विनोदी लेखक, नेमाडे आणि बरेच ( सगळे नव्हे ) बुद्धिप्रामाण्यवादी लोकांनी पाडलेली आहे -- तीच चालू ठेवावी -- वरील अवतरणात एलकुंचवारांनी कुणाचाही अधिक्षेप केलेला नाहीय -- असो -- सर्वांनाच आपापले आकलन मांडण्याचा मोकळेपणा ठेवायला हवा -- आपल्याला न समजणारे वा न पटणारे काही आले की चवताळून उठायचे, हे चांगले नव्हे -- हेही एक मत समजून सोडून द्यावे -- तसे तर बरेच कलावंत आपापल्या आकलनाप्रमाणे काम करतच राहतात -- कुणाच्या हेटाळण्याला ते जुमानत

नाहीत -- सांस्कृतिक वातावरण प्रभावबद्ध करण्याचे प्रयत्नही चालू असतात -- त्यालाही असे काही कलावंत धूप घालत नाहीत --

मी मंटोचे फारसे वाचलेले नाही -- क्वचित कधी अनुवादित कथा वाचल्या असतील --

बुद्धीच्या मर्यादा ओलांडणाऱ्या भानाची तुम्हाला बौद्धिक व्याख्या हवी आहे ! एकरेषीय नसणाऱ्या गोष्टीचे एकरेषीय वर्णन हवे आहे !

महेश एलकुंचवार काय म्हणतात, ते पाहा –

“ नाटकाने रंजन केले पाहिजे, प्रबोधन केले पाहिजे, प्रतिगामी मूल्यांवर प्रहार केले पाहिजेत. उत्तम. हे नाटकाने केले पाहिजे असे वाटणे अगदी वैध व लेजिटिमेट आहे. पण हे न करणारे नाटक ( हीच मंडळी ठरवतात त्याप्रमाणे ) रद्दबातल कसे होते ? कोण्या कलावंताला कुठल्या, कोणत्या हाका येतील, हे ठरवता येत नाही व आपल्याला येतात त्याच हाका त्याला येत नाहीत म्हणून त्याचा शोध अवैध, अनैतिक ठरवून यांचे समाधान होत नसते, तर त्या कलाकृतीचे ‘ कला ‘ पणच येथे अमान्य असते. असे करणे अगदी फासिस्ट आहे, हे एरवी कट्टर फासिझमविरोधी विचारवंतांच्या लक्षात येत नाही का ? पूर्ण विचार स्वातंत्र्याची, आविष्कार स्वातंत्र्याची निखळ भूमिका घेणारी माणसेच खूपदा दुसऱ्याच्या आविष्कार स्वातंत्र्यावर एक प्रकारचे नैतिक दडपण आणतात. आस्तिकांपेक्षा नास्तिकांनीच जास्त कडवे व असहिष्णू असावे, त्यातलाच हा प्रकार.

-- अक्षरयात्रा २००८-९ पृष्ठ ८.

वरच्या मजकुरात राजन खान जे म्हणताहेत ते ' कलेसाठी कला ' असल्या कॅटेगरीतले नाहीय !

बौद्धिक, वैचारिक रचना वेगळी आणि समावेशक भान वेगळे -- बौद्धिकताच फक्त शक्य आहे, अशी निष्कर्षात्मक भूमिका कलेतल्या व्यापक भानाला मुकते --

" लेखकाला किंवा लिखाणाला अस्मिता असावी, हे मला पटत नाही.तो प्रकार एकांगी, एकारलेला आणि प्रचारकी ठरतो. लेखक हा फक्त लेखक असावा, तो कुणाचाच नसावा. लेखन हे फक्त लेखन असावं आणि ते सर्वांचं असावं. लेखन हे नेहमी निर्विकार, निर्विष आणि तटस्थ असावं आणि ते सर्वांचंच असावं. कोणत्या तरी एकाच मुद्याचा अभिमान बाळगून त्याचाच

फक्त ढिंढोरा पिटावा असं मला वाटत नाही. मला कशाचाच अभिमान वाटत नाही. हे सगळं जग, त्याच्या सर्व काळांसह मला माझं वाटतं, पण त्यातले कृत्रिम भेद मला माझे वाटत नाहीत. "
-- राजन खान ( आपले मित्र ) -- आजचा लोकसत्ता -- चतुरंग पुरवणी. ०८-११-१३.
" भूमिका घ्या " म्हणणारे आणि " भूमिका घेतो " म्हणणारे खूप आहेत मराठीत. थोडे असेही असू द्यात !

' भूमिके ' मुळे कलेवर बौद्धिकतेची मर्यादा येते -- त्यामुळे ती एकरेषीय होते आणि त्यामुळे अर्थवत्तेची समृद्धता प्राप्त करू शकत नाही -- तशा कलेचा एक ठरलेला ' हेतू ' असतो --

मतभेद ! ' भूमिका ' ही चांगल्या कलेला अडथळा ठरते, असे माझेही मत आहे -- त्यांच्या साहित्याबाबत आपले मतभेद असू शकतील --

माहीत नाही -- ' बिढार ' वर मी एक लेख लिहिला होता -- सकारण ती कशी एक दुय्यम कादंबरी आहे ते सांगणारा -- नेमाड्यांसारखी नुसती शेरेबाजी न करता --

त्यावर प्रश्नच विचारायचे टाळले तर कुठाय absurdity ?

धाडसी माणसालाच हे दर्शन शक्य ! सवयींना चिकटून बसणाऱ्याला नाही --

सारांश, ( जास्त ओळींच्या पोस्टी असल्यास ) ७-७ ओळींचे भाग करून त्यांना ओळीने क्रमांक देऊन पोस्टी देणे !

उपरोध आहे, पण, तो पूर्ण मानवी जगण्यातल्या absurdity चा आहे --

यात पहिल्याच कडव्यात जॉनी वॉकर एकाचे पाकीट मारतो !

लोकांना खुश करणे नाहीय हे ? की खरेच आत्मिक क्रांती झालीय ?

Zund is isolation, seclusion, separation and self-glorification -- it has to be in conflict -- it has to be violent -- it cannot be good --

Give examples of good zundies --

परस्पर विरोधी हिंसेचा मार्ग अवलंबणारे समुदाय म्हणजे झुंडी नव्हेत ?

झुंडींची जनजागृती ?

तिथे अनाउन्सर पदासाठी ऑडिशन्स घेतल्या जातात -- मुख्य अट असते ती ही की तो वा ती काय बोलताहेत ते कुणालाही कळता कामा नये !

म्हणजे झुंडीने जगणे हीच फक्त माणसाच्या जगण्याची शक्यता आहे -- हे तुला मान्य आहे -- मग, सगळेच समर्थनीय ! दहशतवादीही ओके आहेत ! प्रश्नच मिटला !

गुन्हेगारी करण्याची असमर्थता, असे म्हणून कसे चालेल ? ' झुंड ' हा माणसाच्या जगण्यातला एक गंभीर प्रश्न आहे, हे आख्ख्या जगाला जाणवते !

याचा अर्थ, सर्वच झुंडींना तुमची मान्यता आहे ! मग, तुम्हाला काहीच प्रश्न नाहीय -- ज्यांना हा प्रश्न वाटतो ते एकमेकांशी बोलतात, इतकेच ! तुम्ही द्या सोडून --

थोडक्यात म्हणजे, ' संवेदनशीलता ' हा शब्द भाषेत असायचीच गरज नाही ! हे बेष्ट !

वाद आणि चर्चा निरर्थक असतात याचे ज्ञान झालेय बहुतेक सगळ्यांना !

हे मान्य ! धीरे धीरे चल -- चाँद गगनमें !

एखाद्या पोस्टमध्ये अनेक गोष्टी दडलेल्या असतात -- पोचल्या तर ठीक -- अन्यथा, छोड दो -- असेच करावे लागते -- नाही तर प्रत्येक वेळी निबंधच लिहीत बसावे लागेल !

गंमतीचा एक साम्यबिंदू दाखवलाय, इतकेच --

महत्त्वाचा लेख ! झुंडीत न जाता एकटेपणाने जगायची हिंमत, असे काही असते का, याचेही शास्त्रीय विवेचन व्हावे.

स्मरणशक्ती चांगली नाहीय, हे विसरून जा !

कोणत्या तरी धर्मात धार्मिक असलेल्या माणसाने इतरही धार्मांच्या कार्यक्रमांत सामील होणे घडले तरी तो नेहमीचे पाठांतर म्हणू शकतो की सगळ्यांचा देव, अल्ला एकच आहे ! बिचारा नास्तिक काय म्हणणार ?

प्रश्न असाही येतो की समजा एकाच व्यक्तीच्या डोक्यात आणीबाणीचे समर्थनही आहे आणि बीजेपीचा विरोधही आहे, तर त्या व्यक्तीला काय तुम्ही हाफ-मॅड म्हणणार का ? आणि आत्ता तुम्हाला ती व्यक्ती आवडतेय म्हणून पूर्ण शहाणी म्हणणार का ?

म्हणजे, असायचे नास्तिक -- बुद्धिप्रामाण्यवदी -- पण, लोकांच्याच भल्यासाठी का असे ना, सत्ता हवी असेल तर लोकांत मिसळावे लागेल, हे समजून, निरनिराळ्या धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होत राहणे !

थोडक्यात, तुमचेही एक ' सत्य ' -- कदाचित इतर सर्व सत्यांहून ' अधिक ' सत्य !

ते कसे आहे ते ठरवणारे मात्र कायमचे शहाणे !

कुणाच्या तरी नावाने सारखी बोटे मोडत राहण्याने बरे वाटते -- असे म्हणणाऱ्यांसाठीच आहे ही आरोग्यवान पोस्ट ! विचारात घेणे वा न घेणे हा त्यांचा प्रश्न !

कल्पित कहानी, रोमांस, उपन्यास -- असेही अर्थ आहेत.

आयनेस्को पढो और खुद जान जाओ --

असंगत, व्यस्त, अतार्किक --

कधी, कुठे, किती बोलावे याबाबतही मते वेगवेगळी असतात रे ! तुझीमाझी मते फायनल नसतात !

मग, तुझे म्हणणे काय -- सगळ्यांनी गप्पच बसावे ? एखादी वाईट गोष्ट जुनी आहे म्हणून तीवर बोलूच नये ? तुझ्या मते, नागरिकांचे आदर्श वागणे-बोलणे कसे असायला हवे ?

Edit

Champra Deshpande replied to Ramesh Zawar's comment.

ही सिस्टीम राबवण्यातला आपला सगळ्यांचा वेडेपणा व्यक्त करण्यासाठी ही पोस्ट आहे -- कुणाला जास्त कळते याचा शोध घेण्यासाठी नाही --

शिवाय, कुणीही स्वत:च्या विचारांशी एकनिष्ठ नसणे, याचे काय ? तुम्ही लाख अभ्यास करा, ते पटकन दुसरीकडेच उडी मारतात ! तुम्ही करत बसा विचारांचा अभ्यास !

अशा सगळ्या दुर्दैवाची मिळूनच झालीय ही पोस्ट ! आणि पूर्ण माहिती व ज्ञान कुणालाच नसते -- कुणीच स्वत:कडे श्रेष्ठत्व घेण्याची लोकशाहीत सोय नाही !

किरण, लोकशाही ही -- सगळे जाणून घेऊन मग मत, अशी कधी चालते का ? सगळ्यांचे जाहीरनामे अभ्यासून कोण करते मतदान ?

नाही पटत --त्या ४५ टक्क्यांमध्ये कारकून, शेतकरी, कारानदार -- सगळे असतात। आणि फक्त पदवीधारकांनी मतदान करावे, असेही वाटणारे आहेत -- तेही पटण्यासारखे नाही --हा अडाणी आहे, हा फेसबुकवर बोलणारा आहे, वगैरे -- कुणालाच हेटाळता येणार नाही --

आऊटडेटेड नाही झालेला विषय -- पुन्हा भडकतोय --

यावर मात्र जरा अभ्यास करावा लागेल कारण आपण सगळेच महान आहोत !

ते कसेही बनवोत त्यांचे मत -- चर्चेला विरोध का करावा ? आणि ४५ टक्क्यांमध्ये अमुकच लोक येतात असे काही नाही.

भारताच्या कोणत्याही नागरिकाचा चर्चा करण्याचा हक्क कुणालाही हिरावून घेता येणार नाही ! तो घरी चर्चा करेल नाही तर रस्त्यावर -- त्यातून तो त्याचे मत बनवणार, हे सर्वमान्य आहे ! प्रत्येक माणूस आंदोलक वा राजकारणी कसा होणार ?

होय -- डोके बदलल्याशिवाय टोपी कशी बदलणार ?

माझा नाही प्रश्न -- दोन्ही गुडघ्यांचे ऑपरेशन होऊन गेलेले आहे --

फक्त मोदीभक्तच तेवढे वेडे असे माझ्या आकलनात नाही --

त्यांना कट्टर समर्थक म्हणू --

त्यात हिंसकपणाही अभिप्रेत आहे --

मी काही बदल केलेले नाहीत -- बसवताना दिग्दर्शकाला त्याचे स्वातंत्र्य असते --

गलतीसे मिस्टेक !

' दिनकर पुरोहितचा खून ' ' गर्जना ' ने छापले होते. छापणाऱ्यांना नेहमीच एक विनंती असायची -- पाच ऑफ-प्रिंटस म्हणजे कात्रणे पाठवा !

मीही नंतर तो कार्बन कॉपीजचा प्रयोग करत असे -- दुसरी कॉपी अस्पष्ट येई --

माझे अक्षर खराब -- त्या टाईपिंगच्या चुका दुरुस्त करून तसे करवून घेणे खूप अवघड -- असंख्य चुकांनी टाईप करत --

तपासनीस धुंदीत वा क्रोधात असेल तर पडतात -- नीट असेल तर मिळतात !

पूर्वी एकदा माझ्या संगणकाचा डेटाच उडाला होता -- पण, ते सगळे इतरत्रही सेव्ह केलेले असल्याने माझ्या सर्व गाथा वापस मिळाल्या !

शब्दात पकडणारे लोक, हे त्याचे कारण असते. शक्य तितकी अचूकता ठेवणे भागच असते.

बऱ्याच उद्योगपतींच्या मालमत्तेवर जप्ती येते -- लिलाव होतात -- शिवाय, लिमिटेड कंपन्यांच्या बाबतीत नियमांची रचना असते, तीप्रमाणे कामे चालतात --

यात भाबडेपणा आहे ? अशा मोठ्या शेतकऱ्यांची कर्जे पूर्णपणे का माफ व्हायला हवीत यावर कुणीच बोलत नाहीय. तुम्हाला माहीत असेल तर तुम्ही सांगा.

मला समर्थने माहीत नाहीत म्हणून तर विचारलेय --

कुणाच्याही बाजूचे होण्यापूर्वी, काय चाललेय, हे तर कळायला हवे --

ती मागणी तपशीलवार सुस्पष्टपणे मांडावी -- ' सरसकट ' आणि ' सातबारा कोरा करणे ' याचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करावा --

तसे तर संवेदनशीलता क्षोणोक्षणी असते, असली तर -- बाकी सगळ्या टिंगली आणि स्वार्थाचे बाजार !

-- शिवाय बेरोजगार आहेत -- व्यवसायात अपयशी झालेले आहेत --

एखाद्या भूमिकेत जखडून घेतल्याशिवाय माणूस जगूच शकर नाही -- ही क्षुद्र कल्पना हॅमर केली जाणे, हेच याचे कारण आहे.

ठीक, पण, संप चिघळू देऊ नका -- लौकर परत या !

अशी वैचारिक उदारता हल्ली दुर्मिळ आहे ! जातीय घाण मनात नसलेली !

अनावश्यक, अप्रस्तुत वाद घालणारे किंवा स्वतःचा अजेंडा राबवण्यासाठी असंबद्ध कॉमेंटस देत राहणारे -- असे क्वचित कुणी भेटतात -- त्यांना फक्त ब्लॉक करावे लागते -- बाकी कुणालाही कधीच मी ब्लॉक करत नाही --

उमेश ! वा ! आता आपण तीन झालो -- रमेश, सुरेश आणि उमेश ! तुझे काय आहे सध्याचे मत ?

१ ते आपल्यसाठीच आहे याची खात्री बाळगावी.
२ नुसते लाईक द्यावे.
३ नंतर मात्र, आपल्या भ्रमनिरासाची शक्यता निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करू नये.

खरे तर, लांबूनच खुश राहावे लागते म्हणून मोर अश्रू ढाळत असावेत -- दुष्ट लांडोरी त्या अश्रूंचा गैरफायदा घेतात !

इथे त्याला इलाज नसतो -- सरळ साध्या गोष्टीला साधा प्रतिसाद मिळेलच अशी खात्री नसते --

सारखा लेफ्ट टर्न घेत राहिला तरच माणूस खड्ड्यात पडतो !

Champra Deshpande commented on his own post.

Monogamy is not a natural state for men OR women… controversial TED lecturer claims that we are all built to be promiscuous
dailymail.co.uk
Christopher Ryan told conference 'we need to move beyond men are from Mars and women are from Venus'
He said 'the truth is that men are from Africa and women are from Africa'
He compared humans to chimps and bonobos who are promiscuous and have sex to bond as well as reproducreproduce
He added monogamy is a state imposed by society, not a genetic disposition

Read more: http://www.dailymail.co.uk/femail/article-2286682/Monogamy-natural-men-AND-women-equally-promiscuous-TED-lecturer-reveals.html#ixzz4gvYuVjsa
Follow us: @MailOnline on Twitter | DailyMail on Facebook

-- हेही विचारार्थ घ्यावे लागेल --...

कविता आणि वास्तव यांतल्या संबंधावर आजच एक पोस्ट दिलेली आहे -- तसा संबंध लावणे चुकीचे असल्याची --

खरे आहे -- पण, स्त्रियांच्या प्रेमकविता यावर एक डॉक्टरेट होणे आवश्यक वाटते !

प्रोब्लेम इतरांनी ओळखण्याचा नाहीय -- नवरा ओळखतो !

पुन्हा वाचा -- तुम्ही म्हणता तो बदल केला तर मुद्दाच जाईल --

लिहिण्यातला हलकेफुलकेपणा कृपया लक्षात घ्यावा --

सदर नाटकाचे नाव ' बुद्धिबळ आणि झब्बू ' असे आहे.

ओशो डॉ. आंबेडकरांना भेटलेले होते -- एका भाषणात त्यांनी म्हटले आहे की त्यांनी पाहिलेला सर्वात बुद्धिमान माणूस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर !

उपस्थित केलेल्या प्रश्नांवर का नाही बोलत तुम्ही ?

समता, बंधुता, न्याय मान्य नसलेले कलावंत कोणते ?

म्हणजे ज्ञानेश्वरी साम्यवाद्यांना मान्य असेल ?

त्याला धुके म्हणू नका -- प्रश्न काय विचारले आहेत, ते पुन्हा एकदा पहा -- त्यांबद्दल बोलले जायला हवे --

या एकूण चर्चेवरून साधारण असा सारांश दिसतो –
